**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५०

दिनांक १८-०९-२००७

श्री. नागराज चांदबा गायकवाड, : अपिलार्थी
न्यू पहाडसिंगपूरा, लेणी रोड, घर नं.
१/६/९९, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, :
डॉ. झाकीर हुसेन अध्यापक विद्यालय,
म्हैसमाळ रोड, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी,
सीमा नर्सिंग होम, रोशनगेट, औरंगाबाद

(प्रत्यक्ष : अपिलीय अधिकारी -- अध्यक्ष, एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी)

**विवेचन**

या प्रकरणाची चौथी सुनावणी आज दिनांक १८-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नागराज चांदबा गायकवाड औरंगाबाद हे त्यांचे वकील श्री. सिध्देश्वर सुंदरराव ठोंबरे यांचेसह (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डॉ. झाकीर हुसेन अध्यापक विद्यालय श्री. शेख अजिमुद्दीन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल)

व श्री. सुनिल रतनसिंग चौहाण सहाय्यक शिक्षण संचालक हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांचे कडील दिनांक २५-०८-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शैक्षणिक संस्थेसंदर्भात एकूण ३६ मुद्दया-वर विद्यालय स्थापन झाल्यापासून ३१ मार्च २००६ पर्यंतची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये :

" संस्थेचे नांव, संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांचे नांव, मान्यता प्राप्त दिनांक, विद्यालयाचे शिक्षणाचे माध्यम, प्रवेशक्षमता, विद्यालय अनुदानीत वा विनाअनुदानित, एन. सी. टी. ई. च्या नियमानुसार एका शिक्षकाकरिता आवश्यक असणा-या विद्यार्थ्यांची संख्या, शिक्षकांच्या मान्य पदांची संख्या, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या संवर्गनिहाय आरक्षणाचा तक्ता, कार्यरत शिक्षकांची संख्या, शिक्षकांच्या रिक्त पदांची संख्या, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा अनुशेष बाकी असल्यास तो किती अनुशेष आहे, अनुशेष भरती प्रक्रिया सुरु केली आहे किंवा कसे, अनुशेष किती वर्षापासून शिल्लक आहे, शिक्षक पदासाठीची अर्हता व शैक्षणिक पात्रता, शिक्षकांची यादी, प्रथम नेमणुकीचा दिनांक, पत्ता, जात, संवर्ग व अनुभव, शिक्षकांच्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, कार्यरत प्राचार्याचे नांव, प्रथम नेमणुकीचा दिनांक, पत्ता व जात, संवर्ग, त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, शिक्षक कर्मचा-यांना शासन नियमानुसार नियमित वेतन दिले जाते काय, शिक्षकांची वेतनश्रेणी, शिक्षकांचे वेतन कोणत्या बॅंकेमार्फत अदा करण्यात येते, कार्यरत शिक्षकांच्या बॅंकेचा खाते क्रमांक व शैक्षणिक वर्ष २००५-२००६ चे खाते विवरण, शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतनाचे रजिस्टर, विद्यालयाची संच मान्यता विभागीय उपसंचालकाकडून झाली आहे काय, संच मान्यता झाली असल्यास विद्यालय स्थापन झाल्यापासून ते शैक्षणिक वर्ष २००५-२००६ पर्यतच्या संच मान्यता प्रती, संच मान्यता करुन घेतली नसल्यास त्यांची कारणे, भारत सरकारतर्फे देण्यात येणारी

शिष्यवृत्ती ज्या बॅकेमार्फत देण्यात येते त्या बॅकेचे नाव, बॅकेतील शिष्यवृत्तीचा खाते क्रमांक, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपाची नोंद असलेल्या रजिस्टरची सत्यप्रत, शिष्यवृत्ती बॅकेमार्फत देण्यात येत नसल्यास त्याची कारणे, संस्थेस अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झाला आहे किंवा कसे, अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांना घटनात्मक आरक्षण, विद्यार्थी प्रवेश, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भरती वेळी पाळणे आवश्यक आहे किंवा कसे, अल्प संख्यांक दर्जा प्राप्त झाल्यामुळे आपणास प्रवेशासंबंधी कोणते नियम पाळावे लागतात, व तसे काही विशेषाधिकार आहेत काय, विद्यालय ज्या इमारतीत आहे ती इमारत संस्थेच्या मालकीची आहे किंवा कसे, या इमारतीच्या प्रत्येक खोलीचे क्षेत्रफळ व विद्यालयास क्रिडांगणाची सोय उपलब्ध असल्यास त्यांचे क्षेत्रफळ व नसल्यास त्याची कारणे " या माहितीचा समावेश होता.

अपिलार्थीने वरील माहिती टपालाव्दारे अपेक्षिली असून या अर्जामध्ये ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहेत असे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांची संस्था विनाअनुदानित असल्याने अपिलार्थीच्या अर्जाचा विचार करता येणे शक्य नसल्याचे अपिलार्थीस कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये दिनांक ०४-११-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक

१५-०२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे दोघेही हजर आहेत तथापि यापुर्वी या प्रकरणी दोन्ही बाजुंकडून दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांची आजच्या सुनावणीमध्ये दखल घेण्यात येत आहे.

या प्रकरणाच्या प्रथम सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे संबंधीत संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांचे म्हणणे एका पत्राव्दारे आयोगासमोर मांडले होते. या पत्रास त्यांनी वीस रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्पस चिकटविले आहेत. या पत्रामध्ये त्यांनी त्यांची संस्था कायम स्वरुपी विना अनुदानित संस्था असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ कायदा हा त्यांच्या संस्थेला लागू होत नसल्याचे विवेचन केले आहे. त्याच बरोबर अपिलार्थी हे संस्थेच्या अध्यक्षाकडे ५ विद्यार्थ्यांच्या बी. एड प्रवेशाकरिता गेले होते त्यावेळी अपिलार्थीने आपले ओळखपत्र प्राचार्यांना सादर केले असतांना त्यामध्ये, अपिलार्थी हे एका साप्तहिकाचे संपादक, ए. बी. टी. या इलेक्ट्रीकल दुकानाचे मालक आहेत व त्याच बरोबर या ओळखपत्रावर अपिलार्थीच्या भ्रमणध्वनी क्रमांक असल्याचा उल्लेख केला आहे. या पत्रामध्ये त्यांनी अशा प्रकारची व्यक्ति जिच्याकडे एक भ्रमणध्वनी, ए. बी. टी. दुकानाची मालकी व एका साप्तहिकाची संपादक आहे ती व्यक्ती दारिद्रय रेषेखालील प्रवर्गात मोडणे शक्य नसल्याने अपिलार्थीचा अर्ज नामंजूर करावा अशी आयोगास विनंती केली आहे.

तदनंतर अपिलार्थीस ते खरोखरच दारिद्रय रेषेखालील आहे किंवा कसे हे सिध्द करण्याकरिता आयोगामार्फत अपिलार्थीस पुरावा पुरविण्याची मागणी केली होती. अपिलार्थीने ते औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी असल्याने या संदर्भात प्रमाणपत्र घेण्या-करिता औरंगाबाद महानगरपालिकेकडे दिनांक १३-०८-२००७ रोजी अर्ज केला. अपिलार्थी-

च्या या पत्रास उत्तर म्हणून मनपा कार्यालयातील प्रकल्प संचालक यांच्याकडील दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये असे उत्तर दिले आहे की, अपिलार्थीच्या कुटूंबाचे दारिद्र्य रेषेखालील कुटूंब यादीत नाव समावेशासाठीच्या अर्जावर उचित कारवाई करण्यात आली असून प्रारुप यादीत नाव समावेशासाठी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली आहे. दारिद्र्य रेषेखालील यादी अंतीम करण्याचे अधिकार महाराष्ट्र शासनास आहे. यावरुन अर्ज करतेवेळे हे खरोखरच दारिद्र्य रेषेखालील होते किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात शंका निर्माण होते.

जन माहिती अधिकारी यांच्या, त्यांची संस्था विनाअनुदानित असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा त्यांना लागू आहे किंवा कसे याबाबत शिक्षण उप संचालक औरंगाबाद यांचे मत मागविले होते. यावर त्यांनी संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांचे अभिप्राय मागवून सदर अभिप्राय राज्य माहिती आयोगास दिनांक १९ जुलै २००७ रोजी पाठविले आहेत. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संशोधन परिषद यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता या पत्रामध्ये त्यांनी माहिती अधिकार अधिनियम हे या प्रकरणातील शैक्षणिक संस्थेस लागू होत असल्याचे मत व्यक्त केले आहे.

संबंधीत कार्यालयाने या पत्रामध्ये माहिती अधिकार अधिनियम हे अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस कशा प्रकारे लागू होते याचे सविस्तर विवेचन केले आहे. यामध्ये त्यांनी महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी सेवा शर्ती विनियमन अधिनियम १९७७ मधील शाळेची व्याख्या, अधिनियमाच्या व्याप्तीचा आधार घेतला आहे. शाळेच्या व्याख्येमध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, शाळा म्हणजे, " प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा किंवा उच्च माध्यमिक शाळा किंवा अशा कोणत्याही शाळेचा कोणताही भाग शिक्षणशास्त्र विद्यालय किंवा पदवी पातळीपेक्षा खालच्या पातळीचे शिक्षण किंवा प्रशिक्षण देणारी इतर कोणतीही परिसंस्था किंवा

तिचा भाग यामध्ये तंत्र व व्यवसाय शिक्षण देणा-या कोणत्याही परिसंस्थेचा समावेश होतो." त्यांनी पुढे याच अधिनियमातील नियम क्रमांक ३ चा संदर्भ दिला आहे. नियम क्रमांक ३ खालील प्रमाणे आहे.

" या अधिनियमाच्या तरतुदी महाराष्ट्र राज्यातील सर्व खाजगी शाळांना लागू होतील, मात्र त्यांना राज्य शासनाकडून कोणतेही सहाय्यक अनुदान मिळत असो किंवा नसो."

वरील बाबींचा विचार केला असता शिक्षणशास्त्र विद्यालयाचा समावेश शाळेच्या व्याख्येत होतो व हा अधिनियम सर्व शाळांना म्हणजेच पर्यायाने डि एड कॉलेजला लागू होतो. त्यामुळे सदर अधिनियमातील व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी सेवाशर्ती विनियमन अधिनियम १९८१ या मधील तरतूदी डि एड कॉलेजला लागू होत आहेत. या अधिनियमातील व नियमावलीतील तरतूरीनुसार अध्यापक विद्यालयावर शासनाचे किंवा त्यांच्या प्रतिनिधीचे नियंत्रण आहे.

या सर्व अध्यापक विद्यालयास एन. सी. टी. ई. हे केंद्र शासनाचे प्राधिकरण मान्यता देते. हे प्राधिकरण देखील केंद्र शासनाच्या कायद्याव्दारे स्थापन झालेले आहे. एन. सी. टी. ई. नोटिफिकेशन दिनांक १३-०१-२००६ मधील कलम ८ – १० अन्वये संबंधीत परिक्षा घेणा-या मंडळाची सलग्नता मिळाल्याशिवाय संबंधीत संस्थांना प्रवेश करता येणार नाही अशी तरतूद आहे. ही परिक्षा परिषद हे शासनाचे एक प्राधिकरण आहे. या शासकीय प्राधिकरणाची सलग्नता संबंधीत डि एड कॉलेजजा मिळाल्याशिवाय त्यांना प्रवेश करता येत नाही. एन. सी. टी. ई. ने परवानगी देतांना त्यांच्या परवानगी आदेशात संबंधीत विद्यापीठ / राज्य शासनाची मान्यता घेण्याची अट परवानगी पत्रात नमूद करते. एन. सी. टी. ई. ने जरी संबंधीत शिक्षकांची / प्राचार्याची शैक्षणिक पात्रता निश्चित केलेली असली तरी त्यांच्या नेमणूका ज्या निवड समितीच्या शिफारशी प्रमाणे केल्या जातात त्या निवड समित्या स्थापन

करतांना राज्य सरकारने मान्य केलेली तत्वे विचारात घेणे एन. सी. टी. ई. ॲक्ट प्रमाणे अनिवार्य आहे. त्याचबरोबर संबंधीतांचा सेवा काळ ठरवितांना राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार तो ठरविले जावा अशी या कायद्यात तरतूद आहे. थोडक्यात, एन. सी. टी. ई. ने किमान पात्रतेचे निकष ठरविले असले तरी डि एड कॉलेज मधील सेवा महाराष्ट्र शासनाच्या कायद्यानुसार नियमीत करण्यात येते त्यामुळे डि एड कॉलेजवर महाराष्ट्र शासनाचे नियंत्रण आहे.

अध्यापक विद्यालय चालविणा-या संस्था या पब्लिक ट्रस्ट ॲक्ट व सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्टनुसार रजिस्टर झालेल्या सार्वजनिक संस्था असतात व या कायद्याखाली नोंदविलेल्या संस्थांनाच अध्यापक विद्यालय सुरु करण्यास मान्यता दिली जाते. एन. सी. टी. ई. ने मान्यता दिल्यानंतर त्यांची कर्तव्ये पार पाडण्याकरिता आवश्यक प्रक्रियांवर व तेणेकरुन ही विद्यालये चालू ठेवण्यावर राज्य शासनाचे नियंत्रण असते त्यामुळे या सर्व संस्था सार्वजनिक प्राधिकरण या प्रवर्गात मोडतात. सबब सर्व अध्यापक विद्यालये माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम २ (ज) नुसार माहिती अधिकाराच्या कक्षेत मोडतात असे मत या पत्रामध्ये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद त्यांनी व्यक्त केले आहे. शालेय शिक्षण विभागाच्या पत्र जा. क्रमांक टी. सी. एम. २००५/१८/०७/माशि, दिनांक २० जानेवारी २००७ अन्वये प्रत्येक अध्यापक विद्यालय हे सार्वजनिक प्राधिकरण असून प्राधिकरणामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. यामध्ये अनुदानित / विनाअनुदानित अल्पसंख्याक / बिगर अल्पसंख्याक असा कोणताही भेद असू शकत नाही. असे अभिप्राय त्यांनी या पत्रामध्ये पुढे दिले आहे.

शिक्षण क्षेत्रातील तज्ञांनी वरील प्रमाणे व्यक्त केलेल्या मताशी आयोग संपूर्णपणे सहमत असून प्रश्नाधीन संस्था ही निश्चीतपणे सार्वजनिक प्राधिकरण आहे त्यावर शासनाचे नियंत्रण आहे अशा मताप्रत राज्य माहिती आयोग आला आहे. जन माहिती अधिकारी व

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही कारण ती विनाअनुदानित आहे हा त्यांचा दावा आयोग अमान्य करत आहे. त्याच बरोबर अपिलार्थी हे दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याबद्दल त्यांच्या मनात साशंकता निर्माण झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयामध्ये थोडा तथ्यांश आढळल्याने अपिलार्थीस ही माहिती मोफत मागविता येणार नाही असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचन पाहता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मागितलेली ही माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रती पृष्ठ २ रुपये या दराने माहिती देण्यापोटीचे शुल्क त्यांचे कार्यालयात भरावे. तदनंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १९ – जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (त्र) च्या तरतुदीस छेद देते व मुद्दा क्रमांक २३ व २७ ची माहिती जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या व्याख्ये मध्ये बसत नाही -- ती वगळून उर्वरीत सर्व माहिती ३० दिवसाच्या आत सशुल्क द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती -- मुद्दा क्रमांक १९, २३ व २७ -- वगळून -- हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाचे आत सशुल्क पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक १८-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नागराज चांदबा गायकवाड, न्यू पहाडसिंगपूरा, लेणी रोड, घर नं. १/६/९९, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डॉ. झाकीर हुसेन अध्यापक विद्यालय, म्हैसमाळ रोड, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी, सीमा नर्सिंग होम, रोशनगेट, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/२४७
सुनावणी दिनांक १९-०९- २००७.

१. श्री.नागराज चांदबा गायकवाड .. अपिलार्थी.
न्यु पहाडसींगपुरा, लेणी रोड,
औरंगाबाद.

विरुध्द

१. प्राचार्य, महात्मा गांधी मिशनचे .. प्रतिवादी
अध्यापक विद्यालय, एन-६, सिडको,
औरंगाबाद.

२. सचिव, ..
महात्मा गांधी मिशनचे अध्यापक
विद्यालय, औरंगाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी दिनाक- १९-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.नागराज चांदबा गायकवाड ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व प्राचार्य, महात्मा गांधी मिशनचे अध्यापक विद्यालय, एन-६, सिडको, औरंगाबाद (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सचिव, महात्मा गांधी मिशनचे अध्यापक विद्यालय, औरंगाबाद या दोघांच्या वतीने ॲडव्होकेट श्री. अनिरुध्द लिंबराज टिकले (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांचे कडील दिनांक २४-०८-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शैक्षणिक संस्थेसंदर्भात एकूण ३४ मुद्दया-वर विद्यालय स्थापना वर्ष ते शैक्षणिक वर्ष २००५-०६ पर्यतची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये- संस्थेचे नाव, संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांचे नाव,

या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी  आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना संबंधीत शिक्षण संस्थेचे जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून न मिळाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १५-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांचे वकिल श्री. अनिरुध्द टिकले यांनी आपला युक्तीवाद आयोगा समोर मांडला. त्यांनी केलेल्या युक्तीवादानूसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा "सार्वजनिक प्राधिकरण" या व्याख्येखाली ज्या संस्था येतात त्यांच्या करताच लागू आहे. त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) मध्ये "सार्वजनिक प्राधिकरण" म्हणजे काय याचे जे स्पष्टीकरण दिले आहे. त्या कलमाच्या तरतुदीवर युक्तीवाद करुन विषयाधीन संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण कशी होत नाही, याचे आयोगापूढे प्रतिपादन केले. त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांची संस्था कोणत्याही संविधानाव्दारे किंवा तदन्वये संस्थेने तयार केलेल्या अन्य कायद्यान्वये, राज्य विधी मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये व समुचित शासनाने काढलेल्या आदेशाव्दारे  स्थापन करण्यात आलेली संस्था नाही. त्याचबरोबर त्यांच्या संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नसल्याने हा कायदा त्यांच्या संस्थेस लागू होत नाही.

सदर कायदा त्यांच्या संस्थेस लागू होत नसल्याने त्यांनी जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका देखील केलेल्या नाहीत. त्यांच्या युक्तीवादाप्रमाणे "कायद्याव्दारे स्थापन झालेल्या" व "कायद्यातील तरतूदी खाली स्थापन झालेल्या संस्था" या दोन्हीही पूर्णपणे भिन्न आहेत. त्यांची संस्था म्हणजे देशाच्या घटने व्दारे निर्माण झालेली संस्था नाही किंवा राज्य विधी मंडळाने पारीत केलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतूदीप्रमाणे निर्माण झालेली नाही. याकरिता त्यांनी "एल.आय.सी" (जीवन विमा योजना) चे उदाहरण दिले आहे. "एल.आय.सी" ही संस्था एल.आय.सी ॲक्ट प्रमाणे स्थापन झालेली आहे. त्याचप्रमाणे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ हे महामंडळ विधानसभेने पारीत केलेल्या कायद्याव्दारे स्थापन झालेली आहे. अशा प्रकारच्या महामंडळाना हा माहितीचा अधिकार कायदा लागू होतो. त्यांच्या या म्हणण्या दाखल त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध निवाडयामधील बरीच उदाहरणे दिली आहेत व त्यांच्या म्हणण्याप्रित्यर्थ त्यांनी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २ (ज) (क)(ख)(ग)(घ) यापैकी कोणतेहि उपकलम त्यांना कसा लागू होत नाही. याचे सविस्तर वर्णन केले आहे. तसेच पुढे त्यांनी असाही मुद्दा मांडला आहे की, त्यांच्या संस्थेची मुंबई पब्लीक ट्रस्ट ॲक्ट खाली फक्त नोंदणी झाली आहे. त्यामूळे कितीही तर्क ताणला तरीही त्यांची संस्था समुचित शासनाने पारीत केलेल्या आदेशानूसार किंवा अधिसूचनानूसार स्थापित झाली आहे, असा त्याचा अर्थ होत नाही.

सदर अद्यापक विद्यालय सुरु करतांना त्यांनी एनसीटीई ची परवानगी घेतली होती. एनसीटीई ही संस्था एक स्वायत्त संस्था असून सदर संस्था ही शासनाचा कोणताही भाग होवू शकत नाही. एनसीटीई संस्था सुरु करण्यास फक्त परवानगी देते. त्यामूळे ती संस्था केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) किंवा (घ) च्या व्याख्येत मोडत

नाही. त्यांच्या संस्थेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे आर्थीक सहाय्य मिळत नाही व कोणत्याही प्रकारची मदत शासनाकडून त्यांना प्राप्त होत नसल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा त्यांना लागू होत नाही.

त्यांच्या युक्तीवादामध्ये त्यांनी पुढे असेही म्हणणे मांडले की, सदरील संस्थेने सीडको या शासनाच्या अंगीकृत कंपनीकडून जरी सवलतीच्या दराने जागा घेतली असली तरी सीडको हे प्राधिकरण व महाराष्ट्र शासन ही दोन्हीही प्राधिकरणे भिन्न असून सीडको या संस्थेस शासकीय प्राधिकरण म्हणून संबोधता येणार नाही. त्यांच्या हया म्हणण्याप्रित्यर्थ त्यांनी श्रीकांत विरुध्द श्री.वसंत या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा हवाला दिला आहे. त्यांनी आपल्या युक्तीवादात दुसरा असा मुद्दा मांडला आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे जे अपील केले त्याचा पाया चुकीचा आहे. कारण दुसरे अपील करतांना प्रथम अपीलाचा निर्णय लागणे आवश्यक असते व या प्रकरणी प्रथम अपीलाचा निर्णय लागला नसल्याने अपिलार्थीने माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करणे हे चुकीचे आहे. त्याचबरोबर त्यांनी अपिलार्थी हे आयोगाकडे स्वच्छ हाताने आले नसून याच संस्थेकडील वृत्तविद्या महाविद्यालयाकडे (College of Journalism) याच अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ खाली काही माहितीची मागणी केली होती व यामध्ये ते दारिद्रय रेषेखाली नाहीत, असा उल्लेख केला आहे. तथापि या अर्जामध्ये त्यांनी मात्र ते दारिद्रय रेषेखाली आहेत असा उल्लेख केला आहे. त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जातील ही विसंगती आयोगाच्या निदर्शनास आणून दिली आहे. अपिलार्थीस त्यांनी अशा प्रकारचा अर्ज या संस्थेच्या वृत्त महाविद्यालयाकडे केला आहे किंवा कसे याची विचारणा केली असता त्यांनी जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी देखत त्यांनी अशा प्रकारचा कोणताही अर्ज या संस्थेकडे केला नसल्याचे सांगितले. जनमाहिती अधिकारी व

जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे पुढे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती त्या संबंधित कॉलेजच्या वेबसाईटवर उपलब्ध असून अपिलार्थीने या वेबसाईवरुन ही माहिती उपलब्ध करुन घ्यावी. त्यांनी पुढे असेही आयोगास सांगितले की, अपिलार्थीने माहितीची केलेली मागणी ही केवळ संस्थेस त्रास देण्याच्या उद्देशाने व संस्थेकडून बेकायदेशिर फायदे उकळण्याच्या दृष्टीने केलेली आहे.

वरील सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात यावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थी तर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, व्यापक जनहित साध्य करण्याकरिता त्याला संस्थेची ही माहिती हवी आहे. त्याचबरोबर त्याला ही माहिती प्राप्त झाल्याने संस्थेचा कारभार जनतेच्या निदर्शनास आणण्यात येईल.

उपरोक्त युक्तीवाद पाहता एक असे लक्षात येते की, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे युक्तीवाद करतांना माहिती अधिकार अधिनियम २००५ हा संस्थेस लागू होत नाही, कारण ही संस्था सार्वजिनिक प्राधिकरण म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अधिनियमाव्दारे केलेल्या व्याख्येमध्ये मोडत नाही. याच मुद्यावर त्यांनी भर दिलेला आहे. सदर संस्थेवर शासनाचे 'नियंत्रण' (Control) असते. या मुद्यासंदर्भात त्यांनी युक्तीवाद केला नाही. अध्यापक विद्यालयांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो किंवा कसे, या करिता राज्य माहिती आयोगाने शिक्षण उपसंचालकाच्या कार्यालयाकडून अभिप्राय मागविला असता, यावर शिक्षण उपसंचालक कार्यालयाने महाराष्ट्रराज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे संदर्भ केला असता त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- १७-०७-२००७ रोजीच्या पत्रामध्ये व्यक्त केलेल्या अभिप्रायानूसार शिक्षण शास्त्र विद्यालयाचा समावेश हा शाळेच्या व्याख्येत येतो व महाराष्ट्र

खाजगी शाळातील कर्मचारी सेवाशर्ती विनियमन अधिनियम १९७७ हा या शाळांना म्हणजेच पर्यायाने डी.एड. कॉलेजला लागू होतो. त्यामूळे सदर अधिनियमातील व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवाशर्ती विनियमन अधिनियम १९८१ मधील तरतूदी डी.एड.कॉलेजला लागू होत आहेत. या अधिनियमातील व नियमावलीतील तरतूदीनुसार अध्यापक विद्यालयावर शासनाच्या प्रतिनिधीचे नियंत्रण आहे. एनसीटीई ने मान्यता दिलेल्या अध्यापक विद्यालयास एनसीटीई चे नोटीफिकेशन दिनांक-१३-०१-२००६ मधील कलम ८/१० अन्वये संबंधित परीक्षा घेणा-या मंडळाची संलग्नता मिळाल्याशिवाय संबंधित संस्थांना प्रवेश करता येणार नाही, अशी तरतूद आहे. यामूळे महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची परीक्षा परिषदेची संलग्नता मिळविणे आवश्यक आहे. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची परीक्षा परिषदेची राज्य शासनाने स्थापना केली असून त्यांची संलग्नता मिळाली नाही तर मुळतः या खाजगी डीएड कॉलेजमध्ये प्रवेश देता येत नाही. या शासन स्थापित परिक्षा परिषदेवर शासनाचे पूर्ण नियंत्रण आहे. एनसीटीई ने परवानगी देतांना त्यांच्या परवानगी आदेशामध्ये संबंधित विद्यापीठ राज्य शासनाच्या परवानगीची अट परवानगी पत्रामध्येच नमूद करण्यात येत असते. एनसीटीईने त्यांच्याकडील शैक्षणिक पात्रता व इतर कर्मचा-यांची किमान पात्रतेचा निकष ठरविला असला तरी डीएड कॉलेजमधील कर्मचा-याच्या सेवा महाराष्ट्र शासनाच्या कायद्यानूसार नियमीत करण्यात येतात. त्यामूळे डीएड कॉलेजवर महाराष्ट्र शासनाचे नियंत्रण आहे. तसेच शालेय शिक्षण विभागाचे पत्र जा.क्र. टीसीएम-२००५/१८/०७,मशि-४, दिनांक-२० जानेवारी, २००७ मध्ये प्रत्येक अध्यापक विद्यालय हे सार्वजनिक प्राधिकरण असून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडे जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी असणे आवश्यक असल्याचा उल्लेख आहे. थोडक्यात या डीएड अध्यापक विद्यालयावर शासनाचे नियंत्रण आहे व ज्या प्राधिकरणावर शासनाचे नियंत्रण असते

ते प्राधिकरण सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत मोडत असल्यामूळे या प्रकरणी विषयाधीन संस्था ही शासकीय प्राधिकरण असल्याचे आयोगाचे मत झाले आहे.

संस्थेतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, त्यांनी एनसीटीईकडून त्यांच्या अद्यापक विद्यालयाची मान्यता घेतली असून एनसीटीई हीच मूळात स्वायत्त संस्था आहे. त्यामुळे ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण नाही व पर्यायाने सदर अध्यापक विद्यालय सार्वजनिक प्राधिकरण नाही. परंतु संस्थेचा युक्तिवाद चुकिचा आहे. कारण एनसीटीई ही संस्था -- जी अद्यापक महाविद्यालय स्थापन करण्यास परवानगी देते -- लोकसभेने मान्यता दिलेल्या राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) अधिनियम १९९३, प्रमाणे मूलतः स्थापन झालेली आहे व तदनंतर तीला स्वायत्ततेचा दर्जा दिला गेला आहे. याचबरोबर संस्था बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट व सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट खाली स्थापन झाली असल्याने त्यांच्यावर धर्मादाय आयुक्तांचे नियंत्रण असते. सदर संस्थेची लेखा तपासणी करण्याचे अधिकार 'धर्मादाय आयुक्त' या सार्वजनिक प्राधिकरणाला आहेत त्यांना या संस्थेचे कोणतेही अभिलेखे पाहण्यासाठी तपासण्यासाठी उपलब्ध होऊ शकतात. अधिनियमातील कलम २ (च) मध्ये "माहिती" शब्दाच्या व्याख्येतील शेवटच्या भागाचे अवलोकन केल्यास त्यामध्ये असे म्हटले आहे की, -"आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशा कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधीत माहिती, यांचा समावेश होतो." जर धर्मादाय आयुक्तांना ही माहिती, माहिती कायद्यान्वये प्राप्त करुन घेता येत असेल तर 'माहिती अधिकाराचा अधिनियम २००५' मधील तरतुदीनूसार कोणत्याही नागरीकास ही माहिती प्राप्त करुन घेण्याचा अधिकार आहे, असे आयोगाचे मत आहे.

संस्थेतर्फे असाही मुद्दा मांडण्यात आला की, या प्रकरणी मूळात पहिल्या अपिलावर सुनावणी झाली नसल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अवैध आहे. तथापि याच युक्तिवादामध्ये संस्थेने आयोगा समोर त्यांची भूमिका स्पष्ट करतांना असे कबूल केले आहे की, 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' त्यांना लागू होत नसल्याने त्यांनी माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका देखिल आजतागायत केलेल्या नाहीत. जर संस्थेने या कारणास्तव माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका मूळात जर केल्याच नाहीत तर जनसामान्यांना मूळात माहिती मिळणार नाही, हे उघड आहे. त्यामुळे यावर संस्थेकडे पहिले अपिल करण्याचा प्रशनच उद्भवत नाही. संस्थे संदर्भात माहिती घ्यावयाची असल्यास नागरीक जाणार कोठे व कुणाकडे हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत आहे. या प्रश्नाचे उत्तर संस्थेच्या प्रतिनिधीने केलेल्या युक्तिवादामध्ये कोठेही नाही. माहिती अधिकाराचा कायदा २००५ हा मूलतः सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यामध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने झाला आहे व संस्थेस त्यांचा कारभार त्यांच्या वरील भूमिकेमूळे पारदर्शक ठेवावयाचा आहे किंवा नाही याबद्दल आयोगापुढे संदेह निर्माण झाल्यामुळे संस्थेचा हा मुद्दा आयोग फेटाळत आहे.

उपरोक्त परिच्छेदातील विवेचनावरुन संबंधित संस्थेवर शासनाचे नियंत्रण असल्याने सदर संस्था ही शासकीय प्राधिकरण असल्याच्या निर्णयाप्रत आयोग आला असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ हा या संस्थेस लागू होतो, असे राज्य माहिती आयोगाचे मत आहे. त्यामूळे अपिलार्थीने त्यांच्या  मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येमध्ये ( जी माहिती बसते ती ) अपिलार्थीस या संस्थेने उपलब्ध करुन द्यावी लागेल.

आयोगापूढे दाखल झालेल्या दुस-या एका प्रकरणामध्ये ( २००७/२५० ) अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखाली असल्याचे अद्यापपर्यंत निश्चीतपणे सिध्द न झाल्याने या प्रकरणी देखिल अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखाली नाहीत, असे समजण्यात येत आहे.

वरील विवेचन पाहता असे आदेशित करण्यात येते की, सचिव, महात्मा गांधी मिशन सिडको, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती (जी माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) च्या व्याख्येत बसते ती माहिती.) हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांचे प्रतिपृष्ठ २/-रुपये या दराने शुल्क घेवून पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत असून खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव, महात्मा गांधी मिशन, सिडको, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती (जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये बसते) साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत अपिलार्थीकडून प्रतिपृष्ठ २/-रुपये या दराने शुल्क घेवून पुरवावी.

३. महात्मा गांधी मिशन या संस्थेने त्यांच्याकडील सर्व विद्यालये / महाविद्यालया मधील जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांचे आत कराव्यात.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे)
दिनांक- १०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत-

१ श्री.नागराज चांदबा गायकवाड, न्यु पहाडसींगपुरा, लेणी रोड, औरंगाबाद.

२ प्राचार्य, महात्मा गांधी मिशन ॲडमिनिस्ट्रेटीव्ह बिल्डींग, एम.एस.एम. एन-६, सिडको, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ सचिव, महात्मा गांधी मिशन ॲडमिनिस्टेटीव्ह बिल्डींग, एम.एस.एम. एन-६, सिडको, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५२२

दिनांक १९-०९-२००७

श्री. उमेश प्रभाकर पटवर्धन, : अपिलार्थी
३३, बन्सीलालनगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. उमेश प्रभाकर पटवर्धन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ श्री. तुपे भाऊसाहेब आप्पाराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बारावी सायन्स शाखेच्या त्यांच्या प्राधिकरणातर्फे घेतल्या जाणा-या, परिक्षाकरिता रोल नंबर आर. ००१३४१ या परिक्षार्थीच्या मार्च २००६ च्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रतीची मागणी केली होती.

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०८-२००६ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला व या पत्राव्दारे अपिलार्थीची विनंती अमान्य केली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार

जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १०-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०८-२००६ रोजी घेऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले. अपिलार्थीचे अपील फेटाळतांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्रात असे म्हटले आहे की, विभागीय मंडळाचा कारभार हा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम १९७७ मधील तरतुदीनुसार चालतो. त्यामुळेच मंडळाकडे असलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका गोपनीय स्वरुपाच्या असतात. मंडळ नियमावली नियम क्रमांक १०४ (३) नुसार विभागीय मंडळाकडून उत्तरपत्रिका अत्यंत गोपनीय समजल्या जात असल्याने त्यांचे पुर्नमुल्यांकन करण्याची, त्या उघड करण्याची, त्यांची तपासणी करण्याची कोणत्याही उमेदवारास मागणी करता येणार नाही किंवा त्यांचा तसा हक्क असणार नाही. या तरतुदीच्या आधारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिति देण्याचे नाकारले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) च्या तरतुदीस अधीन राहून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, अपिलार्थीने ज्या उत्तरपत्रिकांची मागणी केली आहे त्या उत्तरपत्रिका त्यांच्या मुलीच्या असून मुलीचे गुणवत्तेबद्दल त्यांच्या मनात कोणतीही शंका नाही. तिला या संदर्भीय परिक्षेपुर्वी ७५ ते ८५ टक्के असे गुण सातत्याने मिळत असत तथापि माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या मार्च २००६ च्या बारावीच्या परिक्षेत त्या गुणांची पातळी एकाएकी खाली येवून भौतिकशास्त्र, व रसायनशास्त्र व गणित या तिन्ही विषयात तिला अपेक्षेपेक्षा गुण कमी मिळून तिची शैक्षणिक कारकिर्द घसरली, परिणामी त्यांच्या कुटूंबीयांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागला. त्यामुळे आपल्या मुलीला इतके कमी गुण प्राप्त व्हावेत ही कल्पनाही त्यांना सहन न

झाल्याने त्यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे याविषयाच्या उत्तरपत्रिकांच्या प्रतीची मागणी केली होती व आजही ते या माहितीच्या मागणीवर ठाम आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, बारावीच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळतर्फे घेतलेल्या जाणा-या परिक्षेकरिता त्या त्या विषयातील तज्ञ शिक्षक हे परिक्षक म्हणून त्यांच्याकडून नेमले जातात. परिक्षकांनी तपासलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे परत दुस-या तज्ञाकडून नियमन (moderation) केले जाते. त्याच्याकडे सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण प्राप्त झाल्यानंतर त्यातील ज्या विद्यार्थ्यांना काही विषयात अतिउच्च गुण आहेत व काही विषयांत अतिशय कमी गुण आहेत अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे माध्यमिक मंडळतर्फे परत नियमन केले जाते त्यामुळे प्रश्नाधीन असलेल्या अपिलार्थीच्या मुलीच्या गुणांचे विभागीय मंडळातर्फे निश्चितपणे नियमन केले गेले आहे व तसे त्यांनी आयोगासमोर शपथपत्राव्दारे कबूल केले आहे.

वरील प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या स्वतः करिता हवी असून ती माहिती त्यांना प्राप्त झाल्यानंतर व्यापक लोकहित साध्य होईल असे वाटत नाही. ज्या वेळी परिक्षा मंडळाकडून दुस-या तज्ञाकडे परिक्षार्थीच्या उत्तरपत्रिका तपासावयास दिल्या जातात व त्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करुन या उत्तरपत्रिका परत परिक्षा मंडळाकडे दिल्या जातात या संपूर्ण प्रक्रियेमध्ये परिक्षा मंडळ व संबंधीत विषयतज्ञ यांच्यामध्ये विश्वासाश्रित संबंध प्रस्तापित होतात.

आणि अशा पध्दतीत कोणत्या पध्दतीने गुण दिले जातात याबाबतची गोपनीयता हा विश्वासाश्रित संबंधाचा एक मूलभूत घटक असतो. त्याच कारणामुळे गुणपत्रिका जरी उपलब्ध करुन दिल्या जात असली तरी उत्तरपत्रिका मात्र उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत. त्यामुळे असे म्हणता येईल की, उत्तरपत्रिकांना माहितीचा अधिकार २००५ च्या ८ (ड) चे अपवादात्मक संरक्षण आहे. आणि त्यामुळेच एखाद्या परीक्षार्थीला त्याची उत्तरपत्रिका उपलब्ध

करुन दिली तर, त्यात व्यापक स्वरुपाचे जनहित साधले जात नसते. व त्यादृष्टीने उत्तरपत्रिका उपलब्ध न करुन द्यायला ८ (१) कायद्याचे (त्र) नुसार उत्तरपत्रिका ही वैयक्तिक स्वरुपाची बाब आहे व ती प्रगट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक नाही.

जनहिताचा विचार करता उत्तरपत्रिकेच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या तर पुर्नमुल्यांकनाची मागणी येणारच. ह्या पुर्नमुल्यांकनाचे धोरण स्विकारल्यास एवढ्या मोठ्या प्रमाणात पुर्नमुल्यांकन करण्यासाठी जी प्रचंड व्यवस्था लागेल, जी आज शिक्षण मंडळाकडे उपलब्ध आहे किंवा नाही याचा विचार करणे आवश्यक राहील. कारण कोणत्याही विद्यार्थ्याला एकदा उत्तरपत्रिकेची प्रत मिळाल्यानंतर पुर्नमुल्यांकनाची मागणी करण्याची शक्यता ही अधिक राहील आणि उपलब्ध असलेल्या थोड्या वेळेत इतक्या प्रचंड प्रमाणामध्ये पुर्नमुल्यांकनासाठी आवश्यक त्या पायाभूत सोयीसुविधा (इनफ्रास्ट्रक्चर) निर्माण केल्याशिवाय उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम हाती घेतला तर एकूणच परीक्षा व्यवस्थेवर प्रचंड ताण पडेल. त्यामुळे सद्यपरिस्थितीत तर गोंधळ निर्माण होण्याची जास्त शक्यता वाटते व त्यामुळे आज घटकेला तरी माध्यमिक शिक्षण मंडळाची परिस्थिती लक्षात घेता व्यापक जनहिताच्या दृष्टीने उत्तरपत्रिका उपलब्ध करुन न देणे हेच श्रेयस्कर वाटते.

तथापि अपिलार्थीची मागणी लक्षात घेता कालांतराने पुर्नमुल्यांकन करुन देण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे व त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे ह्या गोष्टी विद्यापीठ आणि शिक्षण मंडळ यांना कराव्या लागतील हे या निकालपत्रात नमूद करुन ठेवणे मला आवश्यक वाटते.

अशाच प्रकारची अनेक प्रकरणे केंद्रीय माहिती आयोग व राज्य माहिती आयोगाकडे आली असतांना (श्रीमती त्रिसा आयरीश विरुध्द जन माहिती अधिकारी, केरळ पोस्टल सर्कल त्रिवेंद्रम, कुमारी हर्षा ज्ञानचंद्र पाटील विरुध्द महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक

शिक्षण मंडळ) केंद्रीय माहिती आयोगाने व राज्य माहिती आयोगाने उत्तरपत्रिकांची प्रत मागणे हे संबंधितांचा हक्क असणार नाही अशा अर्थाचा निकाल दिला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उमेश प्रभाकर पटवर्धन, ३३, बन्सीलालनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत

मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५२३

दिनांक १९-०९-२००७

श्री. आण्णासाहेब मुरलीधरराव जगताप, : अपिलार्थी

रा. रायमोह, तालुका शिरुर (का.)

जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा सहाय्यक ग्रंथालय संचालक, समर्थनगर,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा संचालक ग्रंथालय,

महाराष्ट्र राज्य, नगर भुवन, मुंबई – २३

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. आण्णासाहेब मुरलीधरराव जगताप, व

जन अपिलीय अधिकारी तथा संचालक ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य  हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक ग्रंथालय संचालक श्री. सुभाष निवृत्तीराव मुंढे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कै. किसनराव जाधव सार्वजनिक ग्रंथालय या संस्थेच्या अध्यक्षाकडून वेळेवर व नियमाप्रमाणे पूर्ण वेतन धनादेशाव्दारे केले नसल्यामुळे काही माहिती मागविली होती.  अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक १४-०६-२००५ रोजीचा पहिला अर्ज व दिनांक १२-०४-२००६ रोजी केलेल्या दुस-या अर्जासंदर्भात काय चौकशी केली यासंदर्भात माहिती मागविली होती. या संदर्भात अपिलार्थीने एकूण ८ मुद्दयावर माहिती मागविली असून बहुतांशी मुद्दयावर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचाल्याचे दिसून येते. यातील बहुतेक सर्व मुद्दयावर त्यांनी त्यांचे वेतन चेकने अदा झाले नसल्यामुळे तक्रारी केल्या आहेत व त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावरील कारवाईच्या सद्यस्थिती संदर्भात माहिती पुरविण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे.  अपिलार्थीचा प्रथम अर्ज पाहता अपिलार्थीने विचारलेल्या एकूण ८ मुद्दयावरील माहिती पैकी अपिलार्थीचे थकीत वेतन व संदर्भिय ग्रंथालयाच्या तपासणी अहवालाची प्रत हे दोनच मुद्दे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या माहितीच्या व्याख्येत मोडतात असे दिसून आले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कडील दिनांक १७-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले असून अपिलार्थीस हवी असलेली माहिती कै. किसनराव जाधव सार्वजनिक ग्रंथालय रायमोह (का.) तालुका शिरुर जिल्हा बीड यांच्याकडून मागविली असल्याचे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची सुनावणी न घेऊन आपल्या कार्य-शैलीतील बेपवाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या बेपवाई वर्तनाची नोंद सचिव (तंत्र व उच्च शिक्षण) यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय न दिल्याने व्यथित होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. तथापि मध्यंतरीच्या काळात दिनांक १६-०८-२००६ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कडून माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) व २० (२) नुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी हजर आहेत व जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक १६-०८-२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली आहे तसेच अपिलार्थी श्री. आण्णासाहेब जगताप हे कै. किसनराव जाधव सार्वजनिक ग्रंथालय रायमोह, तालुका

शिरुर जिल्हा बीड येथे कार्यरत होते. सदर ग्रंथालय खाजगी असून अशा खाजगी ग्रंथालयांना त्यांच्या दर्जानुसार शासनातर्फे वार्षिक अनुदान दिले जाते. या अनुदानातून अपिलार्थीसारख्या कर्मचा-यांचे वेतन अदा केले जाते. त्याचे वितरण व इतर तपशील सहाय्यक ग्रंथालय संचालक यांच्याकडे नसतो. अपिलार्थी यांनी त्यांच्या सेवा काळामध्ये केलेल्या हलगर्जीपणाबद्दल व सततच्या गैरहजेरीसंदर्भात त्यांना सदरील ग्रंथालयाने वेळोवेळी नोटीसा देऊन सरतेशेवटी कामावरुन कमी केले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती ती संबंधीत ग्रंथालयाकडे उपलब्ध होती त्यामुळे अपिलार्थीस ती देण्याकरिता संबंधीत ग्रंथालयाकडून त्यांना ही माहिती मागवावी लागली. संबंधीत संस्थेने दिनांक ३१-०५-२००६ रोजी संबंधीत माहिती ग्रंथालय संचालकाकडे कळविली होती तथापि त्यावेळी कर्मचा-यांच्या नियतकालीन बदल्या झाल्यामुळे माहिती देण्यास उशीर झाला आहे. ही माहिती अपिलार्थीस न देण्यामध्ये किंवा माहिती देण्यास टाळाटाळ करणे अशा प्रकारचा त्यांचा हेतू नव्हता असे त्यांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केले आहे. अपिलार्थीस दिनांक १६-०८-२००६ च्या पत्राव्दारे पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही प्रमाणात विसंगत माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्देसूद माहिती स्पष्टपणे पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे आयोगास न आढळून आल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम २० अन्वये कोणतीही कारवाई आयोग करु इच्छित नाही तथापि अशी प्रकरणे त्यांनी येथून पुढे अधिक सतर्कने हाताळावीत अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती स्पष्टपणे व मुद्देसूदरित्या पुरवावी.

३. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या बेपवाई वर्तनाची नोंद सचिव (तंत्र व उच्च शिक्षण) यांनी घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आण्णासाहेब मुरलीधरराव जगताप, रा. रायमोह, तालुका शिरुर (का.) जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक ग्रंथालय संचालक, समर्थनगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, नगर भुवन, मुंबई – २३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (तंत्र व उच्च शिक्षण), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५२७

दिनांक १९-०९-२००७

श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे
विभाग, वसमतनगर, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे वसाहत,
जंगमवाडी, पूर्णा रोड, नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, श्री. मधुकर हिराजी मूळे, जन माहिती

अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे वसाहत हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कॅनॉल दुरुस्तीबाबत ०१ ऑक्टोंबर २००५ ते २५ एप्रिल २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. “ आपल्या विभागात वरील काळात किती कॅनॉल दुरुस्ती केली,

२. दुरुस्ती केलेले सर्व कॅनॉलचे एकच टेंडर काढले होते की, वेगवेगळे भाग पाडले होते. कशा प्रकारे टेंडर काढले त्याची प्रत,

३. एकच टेंडर काढले असल्यास त्याचे अंदाजपत्रक व वर्क ऑर्डरची प्रत व रजिस्टर गुत्तेदाराचे नांव,

४. वेगवेगळे भाग पाडले असल्यास प्रत्येकाचे अंदाजपत्रक व वर्क ऑर्डरची प्रत व त्या भागाचे नांव मायनर वाईज,

५. कॅनॉल दुरुस्तीचे टेंडर रजिस्टर्ड गुत्तेदारांना दिले का ? बेरोजगार अभियंतांना दिले, टेंडर घेणारे गुत्तेदार अथवा बेरोजगार अभियंते त्यांची नांवासह यादी खाजगी गुत्तेदार असेल तर त्याची रजिस्ट्रेशनची प्रत,

६. दुरुस्तीचे काम मजुरांचे हस्ते केले की, जे. सी. बी. मशीनने केले, शासनाचे आदेश मजुरांचे हस्ते करण्याचे होते किंवा जे. सी. बी. मशीनने करण्याचे होते ? आदेशाची प्रत,

७. मजुरांचे हस्ते काम केले असेल तर मजुरांना १०० टक्के मजुरीचे पैसे दिले का ? अन्नधान्य दिले का ? अन्नधान्य दिले असेल तर किती व कोणाकडून त्या मजुरांची यादीसह,

८.	आपल्या विभागात कॅनॉल दुरुस्तीसाठी शासनाचा किती फंड आला व वाटप झाला किती. ”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०५-२००६ च्या पत्रान्वये असे उत्तर दिले आहे की, अपिलार्थीने केलेल्या अर्जानुसार विचारलेली माहिती काढण्याबाबत त्यांच्या कार्यालयात कारवाई चालू आहे व माहिती उपलब्ध होताच त्वरीत देणेबाबत कारवाई करण्यात येईल.

तथापि तदनंतर कोणतीही माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये दिनांक १४-०६-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुन त्यामध्ये आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक २६-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत कार्यकारी अभियंता यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे सूचित केल्याचे दिसून येते. त्यांच्या या दिनांक २६-०६-२००६ च्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सूध्दा माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २२-०९-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही व्यक्तिशः अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाहीत. तथापि

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व सचिव (जलसंपदा) यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केल्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार यथायोग्य ती प्रशासकीय कारवाई करुन आयोगास आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहेत :

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांनी कार्यकारी अभियंता पूर्णा पाटबंधारे विभाग वसमतनगर विभाग जिल्हा हिंगोली यांच्यावर त्यांनी या प्रकरणी त्यांच्या कार्यशैलीमध्ये दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे वसाहत, जंगमवाडी, पूर्णा रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३१२
निर्णय दिनांक- २०-०९-२००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ॲड.अजीत एम.देशमुख<br>व्दारा/- गजानन किराणा स्टोअर्स,<br>कारंजारोड, बीड तालूका जिल्हा-बीड. | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, बीड. | | |

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २०-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी ॲड.अजित एम.देशमूख (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे तिघेही गैरहजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक-१२-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे प्रदिप गॅस एजन्सी साठे चौक, बीड या एचपी गॅसशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

१. या एजन्सीमार्फत रिकामे सिलेंडर परत देऊन भरलेले सिलेंडर घेऊन जाणा-या ग्राहकांची दिनांक १६-०२-२००६ व दिनांक- ११-०४-२००६ रोजीची यादी नाव व क्रमांकासह द्यावी.

२. मी स्वतः ग्राहक असून माझा क्रमांक ५१२२६० आहे. माझ्या कार्डावर फेब्रू.२००६ ते आजपर्यन्त किती भरलेले सिलेंडर दिले त्याची तारीखनिहाय माहिती द्यावी.

३. या एजन्सी तर्फे उपभोक्ता कार्डावर असा शिक्का मारुन गॅस पाईप देणे बंधनकारक असल्याचे व त्याशिवाय सिलेडंर मिळणार नाही असे सांगीतले जाते. याबाबतच्या नियमाची प्रत देऊन ही टयुब / पाईप घेणे बंधनकारक आहे का याची माहिती द्यावी.

४. दुसरे सिलेंडर मागणा-या ग्राहकांची प्रतिक्षा यादी केंव्हापासून करण्यात आली. १ फेब्रू. २००६ पासून प्रतिक्षेत असलेल्या किती ग्राहकांना दुसरे सिलेंडर पूरविण्यात आले. त्याची यादी द्यावी.'

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०५-२००६ रोजीचे पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून संबंधित गॅस एजन्सीवर त्यांचे कोणतेही थेट नियंत्रण नसल्याने त्यांचा अर्ज तहसीलदार, बीड यांच्याकडे पाठविला असल्याची माहिती

अपिलार्थीस दिली व तहसीलदार, बीड यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नियमानूसार देण्याचे सूचित केले.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २०-०५-२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची मागणी केली आहे.

अपिलार्थीच्या या प्रथम अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २८-०६-२००६ रोजी सुनावणी घेवून आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मंजूर करुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामुल्य माहिती देण्याचे सूचित केले होते.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २१-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे शास्ती लावण्याची व त्यांनी जाणीवपूर्वक कर्तव्यात कसूर केल्याने २० (२) प्रमाणे त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे तिघेही गैरहजर आहेत. आजच्या सुनावणीची तिसरी वेळी आहे. पहिली सुनावणी

दिनांक- ०३-०८-२००७  रोजी ठेवली असता, अपिलार्थी व जनअपिलीय अधिकारी हे दोघेही गैरहजर होते, तर जनमाहिती अधिकारी हे हजर होते. दिनांक- २८-०८-२००७ रोजी दुसरी सुनावणी ठेवली असता अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी हे गैरहजर होते. आज तिस-या सुनावणीच्या दिवशी म्हणजे दिनाक-२०-०९-२००७ रोजी या सुनावणीच्यावेळी संबंधीत सर्वजण गैरहजर राहीले आहेत. त्यामूळे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या अपिलाचा निर्णय घेण्या शिवाय गत्यंतर नाही, असे आयोगाचे मत आहे. त्याचबरेबर या सुनावणीसाठी संबंधित गॅस एजन्सीचे प्रतिनिधी व  तहसीलदार, बीड यांना सुनावणीसाठी बोलाविले असता तेही सुनावणीस अनुपस्थित राहिल्याचे दिसून आले. या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेश त्यांच्या प्रथम अपिल सुनावणीनुसार दिनांक- २८-०६-२००६ अन्वये दिलेले आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी अर्ज केल्यापासून ते अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यापर्यंत त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने प्रथम केलेला अर्ज व व्दितीय अपिल अर्जामध्ये तीन महिने व पाच दिवस इतका कालावधी लोटल्याचे दिसून येते.

या प्रकरणाची सुनावणीच्या वेळेस जनमाहिती अधिकारी यांना पुरेशी संधी देवूनही ते दोन वेळा गैरहजर राहिल्याचे सखेद नमूद करण्यात येत आहे. त्यांच्या या अनुपस्थितीमूळे त्यांना अपिलार्थीस त्यांनी प्रथम अर्जाव्दारे मागितलेली माहिती देण्यामध्ये स्वारस्य आहे किंवा कसे या बाबत शंका निर्माण होते. आयोगाच्या या विधानास जनअपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या सुनावणी आदेशामध्ये निर्देशीत केलेल्या खालील विधानावरुन पृष्टी मिळते.

“वरील सर्व बाबीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जिल्हा पुरवठा अधिकारी,बीड यांनी प्रदिप गॅस एजन्सीकडून माहिती दिनांक- १२-०५-२००६ रोजी मिळाली असतांना देखील त्यांनी माहिती मागविणारे ॲडव्होकेट देशमूख यांना माहिती मुदतीत सादर केली नाही तसेच अनावश्यक तहसीलदार,बीड यांना पत्र पाठवून या प्रकरणात विलंब केला आहे. ”

जनअपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाशी आयोग सहमत आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग करुन व आयोगाकडील सुनावणीस वीनापरवानगी गैरहजर राहून आपल्या कार्यशैलीमध्ये कर्तव्यपराणतेचा अभाव निःसंशयपणे सिध्द केला आहे व त्याचबरोबर तहसीलदार (बीड) हेही अनाधिकृतपणे आयोगाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्याने त्यांचेवरही प्रशासकीय कार्यवाही करणे गरजेचे आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब अप्पर मुख्य सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड व तहसीलदार, बीड यांच्यावर त्यांनी या प्रकरणी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस माहिती पुरविल्याबद्दल जिल्हाधिकारी, बीड यांनी आपला अहवाल आयोगास तदनंतर सात दिवसाच्या आत सादर करावा.

३ अप्पर मुख्य सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई यांनी जनमाहिती अधिकारी व तहसीलदार, बीड यांनी या प्रकरणी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेचा अभाव सिध्द केल्याबद्दल संबंधित जनमाहिती अधिकारी व तहसीलदार (बीड) यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अन्वये यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून दोन महिन्याच्या आत आपला अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २०-०९-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ ॲड.अजित एम.देशमुख, व्दारा/- गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, तालूका जिल्हा- बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ अप्पर मुख्य सचिव, (महसूल) मंत्रालय मुंबई, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/५२५
निर्णय दिनांक २०-०९- २००७.

१. श्री.भिमा गेणा काळे, .. अपिलार्थी.
व्दारा/- ब.ए.काळे, मु.पो.नाळवंडी,
तालूका जिल्हा-बीड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, नाईकनगर, गेवराई जिल्हा-बीड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा विशेष ..
जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड
जिल्हा-बीड.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २०-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.भिमा गेणा काळे ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक आश्रामशाळा, नाईकनगर, गेवराई जिल्हा-बीड, श्री.चव्हाण देविदास मुन्ना व श्री. घुले गोपीनाथ सुखदेव (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा श्री.एस.आर.दाणे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या माहितीमध्ये-“ ऑडीट रिपोर्ट, शाळा तपासणी अहवाल, विद्यार्थी व कर्मचारी संच मान्यता व वैयक्तिक मान्यतेच्या वर्षेनिहाय सत्यप्रती, अधिकृत रोस्टर, प्रत्येक वेळेस कर्मचारी भरतीच्या वेळी दिलेल्या जाहिराती, अपात्र उमदेवाराची नावे, पत्ते व अपात्रतेची कारणे, पत्रव्यवहाराच्या व भरतीस उपस्थित उमेदवाराचे व अधिका-यांचे नावे पत्यासह यादी, शाळेतील कर्मचा-यांची संख्या, संस्था अध्यक्ष, सचिव, कार्यकारणीतील सभासदांचे नातेवाईक असल्यास त्यांचे कर्मचा-यांशी नाते, त्यांच्या नियुक्तीच्या व त्यांच्या शैक्षणिक पात्रता, पदनाम, वर्तमानपत्रात जाहिरात दिलेल्या वर्तमानपत्रांची नावे व दिनांक, एम्प्लामेंट ऑफीस आदिवासी प्रकल्प, समाज कल्याण ऑफीसकडून मागविलेली उमेदवारांच्या याद्या, मागासवर्गीय सेलला पत्रव्यवहार केल्याबाबत प्रमाणित रोस्टरच्या नोंदवहीच्या सत्यप्रती, भरलेला अनुशेष व शिल्लक अनुशेषाबाबत व त्याची कारणे, वर्षनिहाय आजपर्यंतच्या शाळा समिती कार्यकारणीची यादी व सदर समितीने घेतलेल्या ठरावाची बैठकनिहाय माहे वर्षनिहाय यादी,शाळेला तसेच प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या वर्गनिहाय मान्यता घेतांना दाखल केलेल्या प्रस्तावाच्या सत्यप्रती, प्राथमिक व माध्यमिकच्या मस्टरच्या सत्यप्रती, पगार वाटप रजिस्टरच्या सत्यप्रती, सर्व कर्मचा-यांना पगार वाटप केले काय, नसल्यास कारणे, शाळा वर्ग चालू केल्यापासून आजपर्यंत माहे व वर्षनिहाय, एकूण वेतन व वेतनेतर इमारत भाडेसह मंजूर झालेले अनुदान, निवासी मुलांना भोजनात दररोज व आठवडयातून देण्यात येणारे विशेष पदार्थ, त्यासाठी खर्च होणारे अनुदान, या बाबत तपशील, शाळेच्या इमारत मालकाचे नाव व पत्ता, त्यांचा देण्यात येणारे दरमहा किराया, आजपर्यंत घरमालकाला मिळालेला किराया, नौकरीतून कमी केलेल्या, सोडून गेलेल्या कर्मचा-यांच्या नाव पत्यासह यादी व कारणे, किती कर्मचा-यांच्या वेतनवाढी केव्हापर्यंत रोखण्यांत आल्या व का? नंतर दिल्या का ? कारणे नाव, पत्यासह त्यांची यादी, शाळेला आजपर्यंत मिळालेल्या देणगीदारांची नांवे, देणगीचे स्वरुप, रक्कमा इ., कर्मचारी , पालक, जनतेने शाळेविरुध्द दिलेल्या तक्रारी त्याबाबत

निकालाच्या सत्यप्रती, शाळेच्या १० कि.मी. परिसरातील एनटी संवर्गाची लोकसंख्या व शाळांची संख्या, इतर कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती, आवक जावक रजिष्टरच्या सत्यप्रती, मु.अ. लॉगबुकच्या सत्यप्रती, मुलाखतीस उपस्थित उमेदवारांच्या याद्या, अपात्र उमेदवाराची पत्यासह याद्या व कारणे, आजपर्यंतची नियुक्तीपत्रे व सेवासमाप्तीपत्रे,कोणाच्या आदेशाने जागा भरल्या, भेटी देणा-या अधिका-यांची नांवे, हुद्दा व पत्ते व स्वतःचा स्वयंस्पष्ट अहवालयुक्त खुलासा-” या मुद्यांचा समावेश होतो.

**+ह्य{ह्मफ्ह्मह्मlर्ह्म द्यह्मह्महxह्म ब्हह्मह्मMह्मhह्म Ĕफ्ह्मुफ्यह्मह्म ब्हह्मह्मह्यट्ठ iह्मSह्मु स्म्ह्मP{ह्म {ह्मह्मट्ठ ह्मiह्मह्म +ह्य{ह्मफ्ह्मह्मlर्ह्मxह्मु ब्हह्मह्मु`झ्यह्मह्म म्ह्म ह्यम्ह्मसंह्मर्िंह्म |ह्मब्हह्मह्मhह्मह्मiह्म ब्हह्मह्मह्यट्ठ iह्म ब्हह्मह्मह्यMह्मiह्मफ्ह्म +ह्मट्ठ . म्ह्म iद्यह्मह्मSह्मदह्म॰ह्मुदह्म॰ +{ह्मफ्ह्मह्मlर्ह्मxह्मु ब्हह्मह्मह्यMह्मiह्मफ्ह्मुफ्ह्म दह्म॰्Sह्म ब्हह्मह्मह्यट्ठ iह्म |ह्मयxह्मह्मlह्महĔ स्म्ह्मP{ह्मह्मiह्म म्ह्म Vह्मxह्मब्हह्मह्मह्यट्ठ iह्म +ह्यvह्मĔह्म॰् द्यह्मह्महSह्मु Jह्मफ्ह्मह्मयह्मु, Ĕह्म॰hह्मु ह्यम्ह्मSह्मह्म॰hह्मह्म॰् +ह्मट्ठ , +स्ह्मु ह्यnड्डस्ह्मर्िंह्म द्यह्मुiह्मु. +ह्य{ह्मफ्ह्मह्मlर्ह्मxह्मु Vह्मxह्मब्हह्मह्मह्यट्ठ iह्म +ह्यvह्मĔह्म॰् द्यह्मह्महSद्यह्मह्मĔbट्ठ Ĕफ्ह्मुफ्यह्मह्म +Vह्मह्महब्हह्मvद्यह्मु iह्मु nड्डह्मह्य॰pड्डद्यह्म॰्स्ह्मुJह्मह्मफ्ह्मफ्ह्म +स्ह्मफ्यह्मह्मSह्मह्म =फ्म्ह्मुJह्म iद्यह्मह्महxह्म Ĕफ्ह्मह्म +ह्मट्ठ .**

अपिलार्थीने जरी दिनांक- १९-०५-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज केला होता तरी तो प्रत्यक्षात संबंधित शाळेचे मुख्याध्यापक तथा जनमाहिती अधिकारी यांना उद्देशून न करता त्यांनी तो अर्ज विशेष समाज कल्याण अधिकारी, जिल्हापरिषद, बीड यांच्या कार्यालयात नेवून दिला होता. तो अर्ज जनमाहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनाक- २८-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. या अर्जासोबत अपिलार्थीने दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र जोडले नव्हते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांच्याकडे असलेल्या नस्तीमध्ये अपिलार्थीचे दारिद्ररेषेखालील प्रमाणपत्र उपलब्ध नाही. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नस्त्या या विषयातील अपीला संदर्भातील आहेत. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी अपिलार्थीच्या प्रथम

अपीलअर्ज प्राप्त झाला. त्यावेळी या अर्जा सोबत अपिलार्थीचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र जोडले नव्हते.

अपिलाथीच्या या प्रथम माहितीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ११-०७-२००६ रोजी ही माहिती अपिलार्थीस देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये २६,०००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्या करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नसल्याचे दिसून येते.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात दिनांक- ०१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २७-०७-२००६ व दिनांक-१४-०८-२००६ रोजी घेवून या प्रकरणातील आपला अंतिम आदेश दिनांक-१६-०८-२००६ रोजी पारीत केला आहे. या सुनावणीमध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने प्रथम अपीलअर्जावर २० रुपयाचे मुद्रांकशुल्क असलेले तिकीट लावलेले नाही व निश्चीत केलेल्या नमून्यात अपील अर्ज दाखल केला नाही, असे कारण दर्शवून अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिला सोबत अपिलार्थीने दारिद्रय रेषेखालचे प्रमाणपत्र सोबत जोडल्याचा उल्लेख केला आहे. तथापि या अर्जासोबत ते जोडलेले नाही याची येथे विशेषकरुन नोंद घेण्यात येत आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्या गैरहजेरीची नोंद घेण्यात आली. जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मुळात त्यांना अपिलार्थीने दिनांक- १९-०५-२००६ रोजी केलेला अर्ज दिनांक- २८-०६-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांना विहित मुदतीत अपिलार्थीस त्यांच्याकडे दिनांक- ११-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहितीपोटी आवश्यक ते शुल्क रुपये २६,०००/- इतके त्यांना भरण्याचे सूचित केले. याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीकडे ते दारिद्रयरेषेखाली असल्या बाबतचे प्रमाणपत्र स्वाक्षांकित करुन जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविण्याचे सूचित केले होते व सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्याची त्यांची तयारी या पत्रामध्ये त्यांनी दर्शविली होती.

तदनंतर अपिलार्थीने त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे कधीही सादर केले नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे प्रमाण हे विस्तृत स्वरुपाचे असून ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता एकंदर १३,००० पृष्ठांचे झेरॉक्स प्रति काढाव्या लागणार आहेत.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये काही मुद्दे - उदाहरणार्थ शाळेच्या १० कि.मी. परिसरातील एन.टी. संवर्गाची लोकसंख्या व १० कि.मी. परिसरातील शाळांची संख्या किती आहे तसेच १० कि.मी. परिसरातील शाळांची संख्या किती आहेत. अशा प्रकारची असंबंध्द माहिती देखील अपिलार्थीने मागितली आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारे मुद्दामहून टाळाटाळ केल्याचे व कोणत्याही प्रकारचा कसूर केला नसल्यामूळे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० अन्वये कार्यवाही करण्यात येवू नये, असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यांनी आयोगास अशीही अतिरिक्त माहिती दिली की,अपिलार्थीने माहिती प्राप्त

करुन घेण्याकरिता एकाहून जास्त वकील नेमले आहेत. अपिलार्थी हे जर खरोखरी दारिद्रय रेषेखालील असते तर त्यांनी या प्रकरणी सुनावणीसाठी खास वकिलाची नियुक्ती केली नसती.

अपिलार्थीने मागितलेली माहिती ही मोठया प्रमाणात असून ही माहिती देण्यापोटी संबंधित संस्थेस मोठया प्रमाणात खर्च करावा लागेल व या खर्चाची तरतूद त्यांच्याकडे सध्या उपलब्ध नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने विचारलेली विसंगत माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारलेली कारणे अभिप्राय वगळता इतर माहिती जी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) च्या व्याख्येत बसते. अशी माहिती अपिलार्थीस देणे या प्रकरणी योग्य राहील. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलावून अपिलार्थीकडून या माहितीस (फक्त अधिनियमातील कलम २ (च)च्या व्याख्येत बसणारी) प्राधान्यक्रम ठरवून घ्यावा व अपिलार्थीस जी माहिती अत्यावश्यक आहे ती प्रथम व तदनंतर उर्वरित माहिती अशा क्रमाने ही माहिती  हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र तपासून विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जर अपिलार्थीचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र वैध नसेल तर ही माहिती देण्यापोटी योग्य ते शुल्क आकारावे.

संस्थेकडे जर झेरॉक्सप्रती काढण्या इतपत निधीची उपलब्धता नसेल तर संस्थेच्या सर्व नस्ती व अभिलेख्यावरुन अपिलार्थीने  स्वतः किंवा इतर प्राधिकृत सहायकाच्या मदतीने ही माहिती स्वतःकडील कागदावर स्वखर्चाने लिहून घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत असून खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलावून अपिलार्थीकडून या माहितीस प्राधान्यक्रम ठरवून घ्यावा व अपिलार्थीस जी माहिती अत्यावश्यक आहे ती प्रथम व तदनंतर उर्वरित माहिती अशा क्रमाने ही माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र तपासून विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संस्थेकडे जर झेरॉक्सप्रती काढण्या इतपत निधीची उपलब्धता नसेल तर संस्थेच्या सर्व नस्ती व अभिलेख्यावरुन अपिलार्थीने स्वतः आणि किंवा इतर प्राधिकृत सहायकाच्या मदतीने ही माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

४. जर अपीलार्थीचे दारिद्रेरेषेखालील प्रमाणपत्र वैध नसेल तर ही माहिती देण्यापोटी योग्य ते शुल्क आकारावे.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे)
दिनांक- २०-०९-२००७. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रति,

१ श्री.भिमा गेणा काळे, व्दारा बळीराम एकनाथ काळे, मु.पो. नाळवडी, तालूका व जिल्हा-बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, नाईकनगर, गेवराई तालूका- गेवराई, जिल्हा- बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/५२६
निर्णय दिनांक २०-०९- २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.भिमा गेणा काळे,<br>व्दारा/- ब.ए.काळे, मु.पो.नाळवंडी,<br>तालूका जिल्हा-बीड. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक<br>आश्रमशाळा,अंथरवनपिंप्री ता.जि.बीड. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा विशेष<br>जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड<br>जिल्हा-बीड. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २०-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.भिमा गेणा काळे ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक आश्रामशाळा, अंथरवनपिंप्री ता.जि.बीड, (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा श्री.एस.आर.दाणे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या माहितीमध्ये-" ऑडीट रिपोर्ट, शाळा तपासणी अहवाल, विद्यार्थी व कर्मचारी संच मान्यता व वैयक्तिक मान्यतेच्या वर्षेनिहाय सत्यप्रती, अधिकृत रोस्टर, प्रत्येक वेळेस कर्मचारी भरतीच्या वेळी दिलेल्या जाहिराती, अपात्र उमदेवाराची नावे, पत्ते व अपात्रतेची कारणे, पत्रव्यवहाराच्या व भरतीस उपस्थित उमेदवाराचे व अधिका-यांचे नावे पत्यासह यादी, शाळेतील कर्मचा-यांची संख्या, संस्था अध्यक्ष, सचिव, कार्यकारणीतील सभासदांचे नातेवाईक असल्यास त्यांचे कर्मचा-यांशी नाते, त्यांच्या नियुक्तीच्या प्रती व त्यांच्या शैक्षणिक पात्रता, पदनाम, वर्तमानपत्रात जाहिरात दिलेल्या वर्तमानपत्रांची नावे व दिनांक, एम्प्लामेंट ऑफीस आदिवासी प्रकल्प, समाज कल्याण ऑफीसकडून मागविलेली उमेदवारांच्या याद्या, मागासवर्गीय सेलला पत्रव्यवहार केल्याबाबत प्रमाणित रोस्टरच्या नोंदवहीच्या सत्यप्रती, भरलेला अनुशेष व शिल्लक अनुशेषाबाबत व त्याची कारणे, वर्षनिहाय आजपर्यंतच्या शाळा समिती कार्यकारणीची यादी व सदर समितीने घेतलेल्या ठरावाची बैठकनिहाय माहे वर्षनिहाय यादी,शाळेला तसेच प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या वर्गनिहाय मान्यता घेतांना दाखल केलेल्या प्रस्तावाच्या सत्यप्रती, प्राथमिक व माध्यमिकच्या मस्टरच्या सत्यप्रती, पगार वाटप रजिस्टरच्या सत्यप्रती, सर्व कर्मचा-यांना पगार वाटप केले काय, नसल्यास कारणे, शाळा वर्ग चालू केल्यापासून आजपर्यंत माहे व वर्षनिहाय, एकूण वेतन व वेतनेतर इमारत भाडेसह मंजूर झालेले अनुदान, निवासी मुलांना भोजनात दररोज व आठवडयातून देण्यात येणारे विशेष पदार्थ, त्यासाठी खर्च होणारे अनुदान, या बाबत तपशील, शाळेच्या इमारत मालकाचे नाव व पत्ता, त्यांचा देण्यात येणारे दरमहा किराया, आजपर्यंत घरमालकाला मिळालेला किराया, नौकरीतून कमी केलेल्या, सोडून गेलेल्या कर्मचा-यांच्या नाव पत्यासह यादी व कारणे, किती कर्मचा-यांच्या वेतनवाढी केव्हापर्यंत रोखण्यांत आल्या व का? नंतर दिल्या का ? कारणे नाव, पत्यासह त्यांची यादी, शाळेला आजपर्यंत मिळालेल्या देणगीदारांची नांवे, देणगीचे स्वरुप, रक्कमा इ., कर्मचारी , पालक, जनतेने शाळेविरुध्द दिलेल्या तक्रारी त्याबाबत

निकालाच्या सत्यप्रती, शाळेच्या १० कि.मी. परिसरातील एनटी संवर्गाची लोकसंख्या व शाळांची संख्या, इतर कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती, आवक जावक रजिष्टरच्या सत्यप्रती, मु.अ. लॉगबुकच्या सत्यप्रती, मुलाखतीस उपस्थित उमेदवारांच्या याद्या, अपात्र उमेदवाराची पत्यासह याद्या व कारणे, आजपर्यंतची नियुक्तीपत्रे व सेवासमाप्तीपत्रे,कोणाच्या आदेशाने जागा भरल्या, भेटी देणा-या अधिका-यांची नांवे, हुद्दा व पत्ते व स्वतःचा स्वयंस्पष्ट अहवालयुक्त खुलासा-" या मुद्यांचा समावेश होतो.

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहाता अपिलार्थीने मोठया व विस्तृत प्रमाणात माहिती मागितली आहे व त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली बरीच माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व जनमाहिती अधिकारी यांचे खुलासे, कारणे विचारणारी अशी आहे असे दिसून येते. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील असल्याचा उल्लेख त्यांनी केला आहे.

अपिलार्थीने जरी दिनांक- १९-०५-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज केला होता तरी तो प्रत्यक्षात संबंधित शाळेचे मुख्याध्यापक तथा जनमाहिती अधिकाकरी यांना उद्देशून न करता त्यांनी तो अर्ज विशेष समाज कल्याण अधिकारी, जिल्हापरिषद, बीड यांच्या कार्यालयात नेवून दिला होता. तो अर्ज जनमाहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनाक- २८-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. या अर्जासोबत अपिलार्थीने दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र जोडले नव्हते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांच्याकडे असलेल्या नस्तीमध्ये अपिलार्थीचे दारिद्ररेषेखालील प्रमाणपत्र उपलब्ध नाही. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नस्ती या विषयातील अपीला संदर्भातील आहेत. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांच्याकडे ज्या रोजी अपिलार्थीच्या प्रथम

अपीलअर्ज प्राप्त झाला. त्यावेळी या अर्जा सोबत अपिलार्थीचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र जोडले नव्हते.

अपिलार्थीच्या या प्रथम माहितीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ११-०७-२००६ रोजी ही माहिती अपिलार्थीस देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये २६,०००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्या करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नसल्याचे दिसून येते.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात दिनांक- ०१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २७-०७-२००६ व दिनांक-१४-०८-२००६ रोजी घेवून या प्रकरणातील आपला अंतिम आदेश दिनांक-१६-०८-२००६ रोजी पारीत केला आहे. या सुनावणीमध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने प्रथम अपीलअर्जावर २० रुपयाचे मुद्रांकशुल्क असलेले तिकीट लावलेले नाही व निश्चीत केलेल्या नमून्यात अपील अर्ज दाखल केला नाही, असे कारण दर्शवून अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिला सोबत अपिलार्थीने

दारिद्रय रेषेखालचे प्रमाणपत्र सोबत जोडल्याचा उल्लेख केला आहे. तथापि या अर्जासोबत ते जोडलेले नाही याची येथे विशेषकरुन नोंद घेण्यात येत आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्या गैरहजेरीची नोंद घेण्यात आली. जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मुळात त्यांना अपिलार्थीने दिनांक- १९-०५-२००६ रोजी केलेला अर्ज दिनांक- २८-०६-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांना विहित मुदतीत अपिलार्थीस त्यांच्याकडे दिनांक- ११-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहितीपोटी आवश्यक ते शुल्क रुपये २६,०००/- इतके त्यांना भरण्याचे सूचित केले. याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीकडे ते दारिद्रयरेषेखाली असल्या बाबतचे प्रमाणपत्र स्वाक्षांकित करुन जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविण्याचे सूचित केले होते व सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्याची त्यांची तयारी या पत्रामध्ये त्यांनी दर्शविली होती.

तदनंतर अपिलार्थीने त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे कधीही सादर केले नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे प्रमाण हे विस्तृत स्वरुपाचे असून ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता एकंदर १३,००० पृष्ठांचे झेरॉक्स प्रति काढाव्या लागणार आहेत.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये काही मुद्दे - उदाहरणार्थ शाळेच्या १० कि.मी. परिसरातील एन.टी. संवर्गाची लोकसंख्या व १० कि.मी. परिसरातील शाळांची संख्या किती आहे तसेच १० कि.मी. परिसरातील शाळांची संख्या किती आहेत. अशा प्रकारची असंबंध्द माहिती देखील अपिलार्थीने मागितली आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारे मुद्दामहून टाळाटाळ केल्याचे व कोणत्याही प्रकारचा कसूर केला नसल्यामूळे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० अन्वये कार्यवाही करण्यात येवू नये, असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यांनी आयोगास अशीही अतिरिक्त माहिती दिली की,अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता एकाहून जास्त वकील नेमले आहेत. अपिलार्थी हे जर खरोखरी दारिद्रय रेषेखालील असते तर त्यांनी या प्रकरणी सुनावणीसाठी खास वकिलाची नियुक्ती केली नसती.

अपिलार्थीने मागितलेली माहिती ही मोठया प्रमाणात असून ही माहिती देण्यापोटी संबंधित संस्थेस मोठया प्रमाणात खर्च करावा लागेल व या खर्चाची तरतूद त्यांच्याकडे सध्या उपलब्ध नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने विचारलेली विसंगत माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारलेली कारणे अभिप्राय वगळता इतर माहिती जी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) च्या व्याख्येत बसते. अशी माहिती अपिलार्थीस देणे या प्रकरणी योग्य राहील. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलावून अपिलार्थीकडून या माहितीचा (फक्त अधिनियमातील कलम २ (च)च्या व्याख्येत बसणारी) प्राधान्यक्रम ठरवून घ्यावा व अपिलार्थीस जी माहिती अत्यावश्यक आहे ती प्रथम व तदनंतर उर्वरित माहिती अशा क्रमाने ही माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र तपासून विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जर अपिलार्थीचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र वैध नसेल तर ही माहिती देण्यापोटी योग्य ते शुल्क आकारावे.

संस्थेकडे जर झेरॉक्सप्रती काढण्या इतपत निधीची उपलब्धता नसेल तर संस्थेच्या सर्व नस्ती व अभिलेख्यावरुन अपिलार्थीने स्वतः किंवा इतर प्राधिकृत सहायकाच्या मदतीने ही माहिती स्वतःकडील कागदावर स्वखर्चाने लिहून घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत असून खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

५. अपील निकाली काढण्यात येत आहे.

६. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलावून अपिलार्थीकडून या माहितीस प्राधान्यक्रम ठरवून घ्यावा व अपिलार्थीस जी माहिती अत्यावश्यक आहे ती प्रथम व तदनंतर उर्वरित माहिती अशा क्रमाने ही माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र तपासून विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

७. संस्थेकडे जर झेरॉक्सप्रती काढण्या इतपत निधीची उपलब्धता नसेल तर संस्थेच्या सर्व नस्ती व अभिलेख्यावरुन अपिलार्थीने स्वतः आणि / किंवा इतर प्राधिकृत सहायकाच्या मदतीने ही माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

८. जर अपीलार्थीचे दारिद्रेरेषेखालील प्रमाणपत्र वैध नसेल तर ही माहिती देण्यापोटी योग्य ते शुल्क आकारावे.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे)
दिनांक- २०-०९-२००७. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रति,

१ श्री.भिमा गेणा काळे, व्दारा बळीराम एकनाथ काळे, मु.पो. नाळवडी, तालूका व जिल्हा-बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, अंथरवनपिंप्री तालूका जिल्हा- बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५२८

दिनांक २०-०९-२००७

श्री. संजय गणेशराव गुंडावार, : अपिलार्थी
मेन रोड लोहा, तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय,
कंधार, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
नांदेड

प्रत्यक्षतः   जन माहिती अधिकारी  -- कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का.

जन अपिलीय अधिकारी – तालुका कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का.

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संजय गणेशराव गुंडावार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का. श्री. विश्वंभर निळकंठराव मंगनाळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का. श्री. अंकुश डी. बरडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१०-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. त्यांनी या अपिलामध्ये जानेवारी २००६ ते मार्च २००६, कृषि मंडळ बारुळ अंतर्गत जून २००५ ते डिसेंबर २००५ फेब्रुवारी २००५ ते जून २००६ या कालावधीत शासनाचे आलेले बजेट याचा विनियोग व गटनिहाय गावनिहाय झालेल्या कामाची माहिती व काम केलेल्या मजुराच्या नावाची यादी मस्टरसह अशी माहिती विचारली होती.

अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या या अर्जाची छाननी करता असे दिसून आले आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपिलामध्ये मागितलेली माहिती व प्रथम माहिती-साठीच्या केलेल्या अर्जातील मागणी केलेली माहिती व त्यावर केलेल्या अपिल अर्जातील माहिती या विषय व कालावधीसह भिन्न असल्याचे आढळून येते. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत चुकिची कागदपत्रे दाखल केली असल्याने त्याचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय गणेशराव गुंडावार, नगरेश्वर मंदिराजवळ, डॉ. गुंडावार यांचा दवाखाना, मेन रोड लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का. कंधार

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का. कंधार

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५२९

दिनांक २०-०९-२००७

श्री. संजय गणेशराव गुंडावार, : अपिलार्थी
नगरेश्वर मंदिराजवळ, डॉ. गुंडावार यांचा
दवाखाना, मेन रोड लोहा, तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय,
कंधार, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी -- कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का. कंधार
जन अपिलीय अधिकारी – तालुका कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का. कंधार

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संजय गणेशराव गुंडावार हे गैरहजर

आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का. श्री. विश्वंभर निळकंठराव मंगनाळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का. श्री. अंकुश डी. बरडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " सन २००३ ते २००५ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजने अंतर्गत २००३ ते २००५ या वर्षी शासनाचे आलेले बजेट व त्याचा विनियोग व गटनिहाय व गावनिहाय झालेल्या कामाची माहिती व काम केलेल्या मजुराच्या नावाची यादी मस्टरसह " ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस ही माहिती तयार करण्यासाठी शुल्क रुपये ३००० त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस पोस्टाने त्याच दिवशी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक ४०५ अन्वये पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेल्या आवक जावक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येत आहे. या पत्रामध्ये त्यांनी त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस देण्याकरिता प्रस्तावित माहिती गोळा करण्याचे काम चालू असून अंतीम शुल्क अपिलार्थीस नंतर कळविण्यात येईल असे म्हटले आहे. यानंतर परत जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २४-०३-२००६ रोजी पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीस त्याने मागणी केलेली माहिती देण्यासाठी एकूण ४९,६२६ रुपये इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याविषयी सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रावर अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) नुसार दिनांक २५-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या मनात माहिती अधिकार अधिनियम २००५ बद्दल असलेला अनादर स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. सदर सुनावणी का घेतली नाही असे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता त्यावेळी ते तालुका कृषि अधिकारी या पदावर कंधार येथे कार्यरत नव्हते असे सांगितले. त्यावेळी तालुका कृषि अधिकारी म्हणून श्री. अंकुश मोरे हे अधिकारी कार्यरत होते असे त्यांनी आयोगासमोर सांगितले. सचिव (कृषि) यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्या या अपील न ठरविण्याच्या कृतीची व राज्य माहिती आयोगाप्रती अनादर दाखविण्याच्या त्यांच्या वर्तनाची त्यांनी यथायोग्य दखल घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर निर्णय न घेतल्यामुळे व्यथित होवून अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार दिनांक ११-१०-१००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात

आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपोटी लागणा-या शुल्काची रक्कम ३००० इतकी त्यांच्याकडे दिनांक ०७-०३-२००६ च्या पत्रान्वये कळविली आहे व एकूण रक्कम त्यांच्या दिनांक २४-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे. अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी एकूण ४९६२६ रुपये खर्च लागणार होता व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २४-०३-२००६ च्या पत्रान्वये कळविले देखिल होते. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही दोन वर्षाच्या कालावधीतील असून कृषि विभागाच्या रोजगार हमी योजने अंतर्गत या कालावधीमध्ये चालू असलेल्या कामांची संख्या अंदाजे २५० असून या सर्व कामावर अंदाजे ७००० मजूर त्यावेळी कार्यरत होते. ७००० मजुरांच्या दोन वर्षाच्या मस्टरच्या झेराक्स प्रती देण्याकरिता त्यांना हा खर्च लागणार होता व हा खर्च त्यांच्या मता-प्रमाणे वाजवी आहे. तथापि अपिलार्थीने आवश्यक त्या रक्कमेचा भरणा आजतागायत देखील केलेला नाही. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या कडील दिनांक १४-०३-२००६ रोजीच्या व ०१-०४-२००६ व २५-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती प्राप्त करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठपुरावा केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या पत्रास जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर पाठविल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी का घेतली नाही हे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तसेच उपस्थित जन अपिलीय अधिकारी हेही यासंबंधी जास्त खुलासा करु शकले नाहीत हे पाहता आयोगाचे असे मत झाले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी होणे हे जास्त गरजेचे आहे.

तेव्हा असे आदेशित करण्यात येते की :

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०५-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपला निर्णय पारीत करावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०५-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपला निर्णय पारीत करावा.

३. सचिव (कृषि) यांनी संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्या या अपील न ठरविण्या-च्या कृतीची व राज्य माहिती आयोगाप्रती अनादर दाखविण्याच्या त्यांच्या वर्तनाची यथायोग्य दखल घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय गणेशराव गुंडावार, नगरेश्वर मंदिराजवळ, डॉ. गुंडावार यांचा

दवाखाना, मेन रोड लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का. कंधार

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, ता. कृ. अ. का. कंधार

६ सचिव, (कृषि), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

८ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५१२

दिनांक २७-०९-२००७

श्री. विलासचंद्र मोहनलाल अमीन, : अपिलार्थी

घ. नं. ९६, शनिवार वार्ड, चिंधडे गल्ली,

मालेगाव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा गृहकर अधीक्षक, मालेगाव
महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहाय्यक आयुक्त (कर), मालेगाव
महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०९-२००७ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विलासचंद्र मोहनलाल अमीन हे गैरहजर आहेत तर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गृहकर अधीक्षक मालेगाव महानगरपालिका श्री. वसंत सोमा जाधव व वरिष्ठ लिपीक तथा सहाय्यक माहिती अधिकारी श्री. बाळासाहेब भिकाजी पवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (कर) आता सहाय्यक आयुक्त (सामान्य प्रशासन) श्री. अशोक मोतीराम कापडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ४५/ बी / १ प्लॉट नंबर ५ इस्लामपुरा वॉर्ड वसुली विभाग इस्लामपुरा वॉर्ड क्रमांक ३ येथील मालमत्तेच्या जनरल रिव्हीजनचे १९८५-८६ ते २००५ या कालावधीतील उतारे मागितले होते.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. त्यामध्ये त्यांनी संबंधीत मिळकतीचे सन १९८५-८६ ते २००४-२००५ या कालावधीतील सर्व रिव्हीजन अभिलेख त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळवून सन १९९७-९८ ते २०००-२००१ या चतुर्थ वार्षिक वर्षाचे त्यांच्याकडे उपलब्ध असलेले जनरल रिव्हीजन अभिलेख अपिलार्थीस पाठविले. अपिलार्थीने माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असल्याने त्यांनी सदर माहिती त्यांच्या विभागाचे शिपाई (श्री. गुलाम मालजी बच्छाव) यांच्या हस्ते अपिलार्थीस दिली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक २०-०१-२००६ रोजी प्राप्त झाली. याप्रित्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या स्थळप्रती वर दिनांकासहीत स्वाक्षरी केल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०३-२००६ रोजी घेऊन आपले आदेश दिनांक १४-०३-२००६ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीने मागितलेल्या उता-यांपैकी १९९७-९८ या वर्षाच्या रिव्हिजन उता-याव्यतिरिक्त उर्वरीत सर्व उतारे वाळवीने नष्ट झाले आहेत हे म्हणणे ग्राह्य धरुन अपील सुनावणीच्या वेळी ज्या वर्षाची उतारे रिव्हीजन प्रक्रिया चालू होती ती रिव्हीजन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अपिलार्थीस २००५-२००६ चे उतारे त्वरीत देण्याविषयी सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदी नुसार दिनांक १९-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी

आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून अपिलार्थीने मागितलेली १९८५-८६ पासून ते २००४-२००५ गृहकर वसुलीबाबत जनरल रिव्हीजन ऑफ असेसमेंट लिस्ट मागितली होती. अपिलाचे कारण म्हणून एखादी चतु:वार्षिक लिस्ट खराब झाली असेल हे शक्य आहे परंतु सर्वच रेकॉर्ड खराब झाले आहे ही जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खरी व संयुक्तीक नाही असा युक्तिवाद केला आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता असे दिसून आले की, अपिलार्थी हे मालेगाव महानगरपालिका हद्दीतील नागरिक असून त्यांची मालेगाव महानगरपालिका हद्दीतील उपरोक्त प्रभागात मालमत्ता आहे. या मालमत्तेचा वापर ते पुर्वी निवासी म्हणून वापर करत होते. तथापि सन १९९७-९८ मध्ये त्यांनी या ठिकाणी मालमत्तेच्या रचनेत बदल करुन या ठिकाणी २९ पावरलूम स्थापित केले. अपिलार्थी जोपर्यत या घराचा उपयोग निवासी म्हणून करत होते तोपर्यत त्यांना मालेगाव महानगरपालिकेतर्फे रुपये ८०० इतकी वार्षिक आकारणी होती. तथापि मालमत्तेच्या बांधकाम व उपयोगाच्या स्वरुपात बदल करुन त्यांचा वापर व्यापारी प्रयोजनार्थ केल्यानंतर महानगरपालिकेने त्याची कर आकारणी सुधारीत करुन ती प्रतिवर्ष रुपये २७४३० इतकी केली. सदर आकारणीवर अपिलार्थीचा आक्षेप असल्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सांगितले.

अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या प्रथम अर्जातील माहिती देण्यासंबंधात जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी त्यांच्याकडे अशा प्रकारच्या मिळकतीची आकारणी दर चार वर्षातून एकदा केली जाते. या चार वर्षाकरिता एकच दर लावलेला असतो. दर चार वर्षानंतर नवीन मिळकतीची नोंद या रजिस्टरमध्ये घेऊन हे रजिस्टर पुढच्या चार वर्षाकरिता अद्ययावत केले जाते. या रजिस्टरला रिव्हीजन बुक असे संबोधले जाते. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या सन १९८५-८६ ते २००५ या वर्षाच्या रिव्हीजन उता-यासाठी एकूण सहा

रिव्हीजन बुकस् उपलब्ध असणे आवश्यक आहे. यापैकी १९८५-८६ ते १९९६-९७ या कालावधीतील रिव्हीजन बुकसना वाळवी लागून, ती नष्ट झाली आहेत त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मागणीप्रमाणे माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना शक्य झाले नाही. तथापि तदनंतरचे या कालावधीतील रिव्हीजन बुक माहितीकरिता त्यांच्याकडे उपलब्ध असून त्यांनी त्यातील उतारे अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये दिलेले आहेत. सन २००१ ते २००५ या वर्षाचे फेरमुल्यांकन प्रशासकीय अडचणीमुळे दर्शविले नाही. (मालेगाव नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्यामुळे) याचा अर्थ सन २००१ ते २००५ या वर्षासाठी रिव्हीजन बुक उपलब्ध नाही. म्हणजेच सन १९९७ ते २००५ या वर्षासाठी एकच रिव्हीजन बुक उपलब्ध आहे व सध्या उपरोक्त प्रमाणे १९९७ चे रिव्हीजन बुक महानगरपालिकेकडे वापरण्यात येत असून त्यातील अपिलार्थीच्या मालमत्तेची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या वेळी २००५ ते २००६ या वर्षाची रिव्हीजन प्रक्रिया चालू होती ती मार्च २००६ रोजी पूर्ण होऊन अपिलार्थीस २००५-२००६ चे उतारे देखील दिनांक २०-०३-२००६ रोजी देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला असता असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविली आहे. जी माहिती त्यांच्याकडे संबंधीत अभिलेख वाळवीमुळे नष्ट झाल्याने देता येणे शक्य नव्हती ती माहिती त्यांना देता येणार नाही हे उघड आहे. अपिलार्थीस आता त्यांना आवश्यक असलेली सर्व माहिती मिळाली असल्यामुळे व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती देण्याकरिता वा अपील ठरविण्याकरिता कोणत्याही प्रकारची जाणीवपूर्वक हयगय झाल्याचे दिसून न आल्यामुळे अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले हे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांच्या करमूल्यासंदर्भात अथवा जन महिती

अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात काही तक्रार असल्यास त्यांनी या प्रकरणी महानगरपालिकेच्या योग्य त्या प्राधिकरणाकडून आपल्या तक्रारीचे निवारण करुन घ्यावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले हे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विलासचंद्र मोहनलाल अमीन, घ. नं. ९६, शनिवार वार्ड, चिंधडे गल्ली, मालेगाव, जिल्हा नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा गृहकर अधीक्षक, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (कर), मालेगाव

महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५१५

दिनांक २७-०९-२००७

श्री. लक्ष्मण सदाशिव बागडे, : अपिलार्थी
बिटको हॉस्पिटल, नाशिक रोड, नाशिक
महानगरपालिका, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा आस्थापना प्रमुख,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका,

नाशिक

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०९-२००७ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. लक्ष्मण सदाशिव बागडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा आस्थापना प्रमुख-उपायुक्त (प्रशासन) नाशिक महानगरपालिका श्री. जे. एम. ढाकरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, " नाशिक महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर कासलीवाल यांना दिनांक २०-१०-२००१ व्यवसाय बंद केलेपासून एन. पी. ए. देण्याचा आदेश मा. आयुक्त यांपी दिलेला आहे. त्या संदर्भातील डॉ. कासलीवाल यांची संपूर्ण फाईल पाहणी करण्यासाठी मला उपलब्ध करुन द्यावी." याकरिता अर्ज केला होता.

सदर माहितीची पाहणी अपिलार्थीने व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद दिला. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २१-०३-२००६ रोजी ११-३० वाजता संबंधीत नस्तीची पाहणी करण्याकरिता बोलाविले होते तथापि त्या दिवशी स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणूक असल्यामुळे महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये बाहेरुन कोणासही प्रवेश दिला गेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात ही नस्ती पाहण्यासाठी उपस्थित राहता आले नाही. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन

माहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविलेले दिनांक १८-०३-२००६ चे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी ही कागदपत्रे नंतर तयार केली असून ही कागदपत्रे बनावट असल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली नस्ती पाहण्याची मूळ मागणी कायम ठेवलेली आहे.

या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००६ रोजी घेऊन दिनांक २६-०५-२००६ रोजी या सुनावणी संदर्भातील आपले आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत संबंधीत नस्ती दाखविण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील आदेशास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १६-०६-२००६ च्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून संबंधीत नस्तीची पाहणी करण्याकरिता अपिलार्थीस ती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक २२-०६-२००६ रोजी प्राप्त झाले.

तथापि तत्पुर्वीच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले होते. सदर अपील आयोगास प्रत्यक्षात दिनांक २१-०६-२००६ रोजी प्राप्त झाले. या अपिलामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) अन्वये प्रतिदिनी रुपये २५० इतकी शास्ती लावण्याची विनंती केली आहे व त्याच बरोबर प्रथम अपील अधिका-यास दंड करण्याचा अधिकार आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, आयुक्त महानगरपालिका नाशिक यांनी त्यांचे आदेश क्रमांक ६४० जा. क्र. आस्था/वशि/ १५१४/२००१, दिनांक २०-०९-२००१ अन्वये त्यांनी महानगरपालिकेतील इतर वैद्यकीय अधिका-यांप्रमाणे खाजगी व्यवसाय बंद केला आहे. अपिलार्थी यांचे सहकारी डॉक्टर कासलीवाल यांना २०-०९-२००१ पासून एन. पी. ए. लागू केला आहे व त्यामुळे त्यांनाही दिनांक २०-०९-२००१ पासून एन. पी. ए. मिळणे आवश्यक असल्याने त्यांनी श्री. कासलीवाल यांच्या संदर्भातील नस्ती पाहण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००६ रोजी अर्ज केला होता व त्यावरील उत्तर त्यांना उशिरात उशीरा दिनांक २०-०३-२००६ रोजी मिळणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपेक्षित होते. तथापि सदर नस्ती उपलब्ध करुन ती पाहण्यासाठी देण्याची प्रथम तयारी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये दर्शविली. या प्रकरणी त्यांनी विहित मुदती-पेक्षा अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यापोटी एकूण ८५ दिवसाचा विलंब लावला असल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी २५० रुपये याप्रमाणे शास्ती लावावी. जेणेकरुन नाशिक महानगरपालिकेत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अधिक प्रभावीपणे अंमल-बजावणी करता येईल. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेले दिनांक १८-०३-२००६ चे पत्र ज्यामध्ये महानगर पालिकेची संबंधीत नस्ती पाहण्यासाठी जन माहिती अधिका-याने तयारी दर्शविली आहे -- हे पूर्णपणे बनावट आहे. त्यांना हे पत्र जन माहिती अधिका-याकडून आजतागायत प्राप्त झाले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत नस्ती पाहण्याची तयारी दर्शविली आहे. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २१-०३-२००६ रोजी सदर नस्तीची पाहणी करण्याकरिता बोलाविले होते तथापि त्या दिवशी स्थायी समितीच्या सभापती

पदाची निवडणूक असल्याने इतर विभागातील अधिकारी / कर्मचा-यांना मनपा इमारतीमध्ये प्रवेश बंद करण्यात आला होता. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०५-२००६ रोजी निर्णय दिल्यानंतर देखील त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर नस्ती पाहण्याकरिता उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले असल्यामुळे त्यांनी ही नस्ती पाहण्यासाठी नकार दिला.

वरील घटनाक्रम पाहिला असता यामध्ये जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस संबंधीत नस्ती उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील भूमिका थोडीशी आक्षेपार्ह आहे असे आयोगाचे मत आहे कारण जर दिनांक २१-०३-२००६ रोजी अपिलार्थीस नस्ती पाहण्याकरिता बोलाविले आणि त्या दिवशी स्थायी समितीच्या सभापती पदाच्या निवडणुकीने शक्य झाले नाही तरीही जन माहिती अधिकारी यांना उर्वरीत दिवशी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याविषयी कोणत्याही प्रकारे विनंती करता आली असती. सदर विनंती दूरध्वनी व लेखी पत्राव्दारे त्यांना करता आली असती. तथापि अशा प्रकारची कोणतीही सकारात्मक कृती जन माहिती अधिकारी यांच्याकडून केली गेली नसल्याचे आज सुनावणीमध्ये निदर्शनास आले आहे. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००६ रोजी खरोखरच पत्र पाठविले आहे किंवा कसे याचा संभ्रम निर्माण होतो कारण जन माहिती अधिकारी यांना आयोगाकडे आपले म्हणणे स्पष्ट करण्याप्रित्यर्थ आयोगाने सूचना देऊनही त्यांनी त्यांच्याकडील आवक जावक रजिस्टर सुनावणीच्या वेळी आणले नव्हते यास्तव जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेल्या अशा प्रकारच्या भुमिकेमध्ये संशय घेण्यासाठी भरपूर वाव आहे. त्याच बरोबर त्यांनी जर अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००६ रोजी माहिती अर्जासंदर्भात पत्र पाठविले होते तर त्याचा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणी आदेशामध्ये कोठेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आढळत नाही.

वरील दोन्ही बाबी पाहता जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणातील वर्तनावर शंका घेण्यासाठी वाव आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, डॉक्टर कासलीवाल यांनाच फक्त व्यवसाय भत्त्यासंदर्भात दिनांक २०-०९-२००१ पासून सर्व फायदे देण्यात आले व हेच फायदे अपिलार्थी यांना नाकारण्यात आले असल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला आहे अशी त्यांची भावना आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असे आदेशीत करण्यात येते की :

आयुक्त महानगरपालिका नाशिक यांनी अपिलार्थी यांच्या प्रकरणात वैयक्तीक लक्ष घालून या प्रकरणी आपला निर्णय त्वरित पारित करावा व या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी पार पाडलेल्या त्यांच्या भूमिकेच्या संदर्भात स्वतः चौकशी करुन आवश्यक वाटल्यास त्यांचेवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल दोन महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले हे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयुक्त महानगरपालिका नाशिक यांनी या प्रकरणात चौकशी करुन जन माहिती अधिकारी यांचेवर, आवश्यक असल्यास, प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल दोन महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण सदाशिव बागडे, बिटको हॉस्पिटल, नाशिक रोड, नाशिक महानगरपालिका, नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा आस्थापना प्रमुख, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५१६

दिनांक २७-०९-२००७

श्री. अन्वर अहमद शकील अहमद, : अपिलार्थी

१८१, नवापुरा, गल्ली नं. ५, मालेगाव,

जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग क्रमांक २,

मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा

नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सहाय्यक आयुक्त (कर), मालेगाव

महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०९-२००७ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अन्वर अहमद शकील अहमद हे गैरहजर आहेत तर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग क्रमांक २ श्री. मो. राशीद मो. बरकती (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (कर) आता सहाय्यक आयुक्त (सामान्य प्रशासन) श्री. अशोक मोतीराम कापडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मालकीच्या मिळकतीच्या आकारणी संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ २० वर्षे जुन्या झोपड्यामध्ये पावरलूम चालू आहे सदर जागा व पुर्व व पश्चिम भागात पार्टीशन खोखा होता. शेजारी कारखानदारानी भिंती बनविली आहे यामुळे सदर खोखा पार्टीशन पडीत गेले आहे सदर जागा जुनी बल्लीपत्रावर उभे आहे. मागील भागात ईट चुनाची भिंती उभी केली आहे. दर्शनी भागात शटर लावले आहे कारण दार सडून गेले असल्याने शटर लावण्यात आला आहे. सदर जागा २००५ साली जनरल रिव्हीजन मध्ये (१) जुनी इमारत झाली किंवा काय (२)

किंवा रिपिरींग (दुरुस्ती) यांचा लेखी खुलासा मिळणे (३) किंवा नवीन यांचा खुलासा. ”

अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत रजिस्टर्ड ए. डी. ने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस काही माहिती दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-११-२००६ रोजी प्रथम अपील कले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक २८-११-२००६ रोजी प्राप्त झाले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-१२-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १८-१२-२००६ रोजी पारीत केले. अपिलार्थी या सुनावणीस हजर होते तथापि त्यांनी सुनावणीच्या हजेरीपत्रकावर सही करण्यास नकार दिला असे जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती बरोबर आढळल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीनंतर अपिलार्थीचे अपील नामंजूर केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत दिलेली माहिती बरोबर आहे. अपिलार्थीची मिळकत पुर्वी लाकडी पार्टीशनमध्ये असून अपिलार्थी हे या जागेत पावरलूमचा व्यवसाय करत होते. या जागेमध्ये त्यांचे ८ पावरलूम कार्यरत होते. १९९७ साली त्यांच्या मिळकतीचे मुल्यांकन करत असतांना ते लाकडी पार्टीशनच्या दराने केले गेले होते. (९४० वार्षिक) तथापि तदनंतर अपिलार्थीने लाकडी पार्टीशनच्या ऐवजी चुना व विटा यांचे सदर बांधकाम करुन दर्शनी भागाला रोलींग शटर बसविले आहे त्यामुळे २००५-२००६ या वर्षी महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेल्या कर मुल्यांकनाच्या वेळी अपिलार्थीने केलेले संरचनात्मक बदल महानगरपालिकेच्या लक्षात आले व बदललेल्या विनिर्देशाप्रमाणे अपिलार्थीने दुरुस्त केलेल्या मिळकतीची नव्याने (जादा दराने) आकारणी करण्यात आली. ही रक्कम पुर्वीच्या रक्कमेपेक्षा जादा असल्याचा अपिलार्थीचा आक्षेप आहे.

अपिलार्थीने विचारलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मिळकतीच्या संदर्भात २० वर्षापुर्वीचा रिव्हीजन उतारा व सध्याच्या रिव्हीजन उता-याची प्रत अपिलार्थीस दिली असती तर अपिलार्थीचे काम भागले असते व त्याच्या प्रश्नांना उत्तरे मिळाली असती असे आयोगास वाटते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी याप्रमाणे कृती न करता त्यांच्या निर्णयाचे समर्थन करणारे पत्र अपिलार्थीस दिले. त्यांची ही कृती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी विसंगत ठरते. अपिलार्थीचा त्यांचेवर महा-नगरपालिकेने आकारलेल्या कर रकमेसंदर्भात काही आक्षेप असल्यास आपल्या मालमत्तेच्या सुधारित कर निर्धारणासंदर्भात त्यांनी महानगरपालिका प्राधिकरणाकडून आपल्या तक्रारीचे निवारण करुन घ्यावे. राज्य माहिती आयोगाच्या सर्वसाधारण कक्षा अपिलार्थीस आवश्यक

ती कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यापुरत्याच मर्यादित आहेत याचा विशेष उल्लेख येथे करणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून अपिलार्थीस त्यांच्या मूळ मिळकतीची रिव्हीजन उता-याची प्रत (सन १९९७-९८ व नवीन मिळकतीचा रिव्हीजन उतारा) सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले हे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून अपिलार्थीस त्यांच्या मूळ मिळकतीचा मूळ व रिव्हीजन उता-याची प्रत (सन १९९७-९८ व नवीन मिळकतीचा रिव्हीजन उतारा) सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अन्वर अहमद शकील अहमद, १८१, नवापुरा, गल्ली नं. ५, मालेगाव, जिल्हा नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग क्रमांक २, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (कर), मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५१७

दिनांक २७-०९-२००७

श्री. कुबेर गोविंदराव मोरे, : अपिलार्थी
डी-७/२६, विजय वसाहत, चांडक सर्कल,
तिडके कॉलनी, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा उप प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,

त्र्यंबक रोड, सातपूर, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण

अधिकारी, त्र्यंबक नाक्याजवळ, जुना आग्रा

रोड, नाशिक

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०९-२००७ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कुबेर गोविंदराव मोरे यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांचा मुलगा हजर आहे. जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था श्री. एस. के. वायदंडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी श्री. डी. ए. दळवी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कुमारी काळे तत्कालीन कनिष्ठ लिपीक औद्योगिक प्रशिक्षण संस्था नाशिक यांच्यासंदर्भात खालील प्रमाणे ३ मुद्दयावर माहिती मागितली होती.

१. “ कुमारी काळे ह्या धुळे येथून औ. प्र. सं. नाशिक येथे १९८० मध्ये कनिष्ठ लिपीक म्हणून अनुकंपाने रुजू झाल्या (वडील वारले म्हणून). कुमारे काळे यांची यांच्या अनुकंपा म्हणून नोकरीच्या आदेशाची प्रत, रुजू अहवाल,

२.  नोकरीवर रुजू होण्यापुर्वी कुमारी काळे यांचा विवाह झाला होता काय, झाला असल्यास त्याबाबतची कागदपत्रे,

३.  श्री. गंगासीरकर माजी अधिकारी हे उपरोक्त कालावधीत (श्री. जुनोनकर, राजवाडे हे अधिकारी देखील) कार्यरत असतांना कुमारी काळे यांचा विवाह झाला आहे ही बाब श्री. गंगासीरकर व उपरोक्त अधिका-यांच्या निदर्शनास आली होती काय, त्याबाबतच्या (टिपण्या) -- केलेली कार्यवाही, (श्री. गंगासीरकर यांनी सादर केलेल्या) किंवा कार्यालयाने याबाबतची संपूर्ण कागदपत्रे."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती बराच प्रयत्न करुनही त्यांच्या कार्यालयात उपलब्ध न झाल्याने त्यांना ती माहिती अपिलार्थीस देता येणे शक्य नसल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००६ रोजी घेऊन दिनांक ०४-१२-२००६ रोजी या संदर्भातील आपले आदेश पारीत केले. या प्रथम सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर होते. अपिलार्थीचे अपील निकाली काढून जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या सुनावणी आदेशात असे म्हटले आहे की, अर्जदाराने कुमारी काळे यांची सन १९८० ची माहिती मागितली आहे. सदर माहिती जवळ जवळ २६ वर्षापुर्वीची असून कुमारी काळे ह्या त्याच वेळी विभागीय बदलीने मुंबई विभागाकडे बदलून गेल्या असल्याने व त्या या

विभागात कार्यरत नसल्याने व त्यांची नस्ती जतन करण्यात आलेली नसल्याने अपिलार्थीने मागितलेली कागदपत्रे त्यांना जन माहिती अधिका-यास उपलब्ध करुन देता आली नाहीत.

वरील प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राह्य धरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०१-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या अपील संदर्भातील निर्णय कळविला नसल्याने त्यांना आयोगाकडे व्दितीय अपील करणे भाग पडले आहे असेही त्यांनी पुढे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील निर्णय प्रथम दिनांक ३१-१०-२००६ रोजी कळविला आहे व या संदर्भात सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रित्यर्थ आज पोस्टाची पोच पावती आयोगास दाखविली आहे. या पोच पावतीवर अपिलार्थीची सही आहे. त्याच बरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-१२-२००६ रोजी त्यांचा निर्णय कळविल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेल्या पत्रावरुन दिसून येते. त्याच बरोबर त्यांनी असेही स्पष्ट केले की, त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने कळविले असून ते प्रथम सुनावणीस हजर राहिले नाहीत. आजही अपिलार्थी आयोगासमोर सुनावणीस हजर झाले नाहीत. त्यांनी सुनावणीची तारीख पुढे ढकलण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि अपिलार्थीची ही विनंती आयोगाने अमान्य केली आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ संदर्भातील माहिती हीच केवळ माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) च्या व्याख्येत बसते. जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती ही २६ वर्षापुर्वीची आहे. कुमारी काळे या १९८० साली नाशिक येथून बदलून मुंबई येथे रुजू झाल्या आहेत सध्या त्या उप संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयात कार्यरत आहेत त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती उप संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयात असणार हे उघड आहे. माहिती अधिकारी व मुंबई येथील उप संचालकांचे कार्यालय हे एकाच प्राधिकरणाचे दोन वेगवेगळे भाग आहेत. अपिलार्थीस त्याने मागितलेली माहिती त्यांच्याकडे आता उपलब्ध नाही, माहिती जुनी आहे, कर्मचा-याची बदली झाली आहे अशी कारणे या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता देणे योग्य नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी उप संचालकाचे कार्यालयातून अपिलार्थीच्या मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ ची माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २० दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी असे आदेशित करण्यात येत आहे. उप संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांना या प्रकरणी असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना या कामी संपूर्ण सहकार्य करावे. त्यांच्याकडून यासंदर्भातील माहितीची मागणी उपसंचालकांकडे प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांना ही माहिती त्वरीत उपलब्ध करण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहील.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ व ३ हे या संदर्भातील माहिती ही " माहिती " या अधिनियमातील कलम २ (च) व्दारे स्पष्ट करण्यात आलेल्या व्याख्येमध्ये

मोडत नसल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देता येणार नाही हे उघड आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्या-करिता उप संचालकाचे कार्यालयाकडे कोणत्याही प्रकारे प्रयत्न न केल्याचे आयोगास दिसून आले आहे. उप संचालक कार्यालय व त्यांचे कार्यालय हे एकाच प्राधिकरणाचे भाग असल्याने त्यांनी स्वतः ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता उप संचालक यांच्या कार्यालयाकडून हस्तगत करणे आवश्यक होते. येथून पुढे अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये त्यांनी ही सावधानता बाळगावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले हे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ ची माहिती, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २० दिवसाच्या आत, अपिलार्थीस विनामूल्य द्यावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कुबेर गोविंदराव मोरे, डी-७/२६, विजय वसाहत, चांडक सर्कल, तिडके

कॉलनी, नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, त्र्यंबक रोड, सातपूर, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, त्र्यंबक नाक्याजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पू.), मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५२०

दिनांक २७-०९-२००७

श्री. लक्ष्मण सदाशिव बागडे, : अपिलार्थी

बिटको हॉस्पिटल, नाशिक रोड, नाशिक

महानगरपालिका, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा आस्थापना प्रमुख,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका,
नाशिक

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०९-२००७ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. लक्ष्मण सदाशिव बागडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा आस्थापना प्रमुख-उपायुक्त (प्रशासन) नाशिक महानगरपालिका श्री. जे. एम. ढाकरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, “ नाशिक महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर डी. बी. पाटील यांची मागील शासकीय सेवा महानगरपालिकेतील सेवेशी सलग धरुन पेन्शन व रजेचा फायदा देऊन त्यांना एक वेतनवाढ देण्याच्या विषयाची नस्ती पाहण्याकरिता ” जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता.

सदर माहितीची पाहणी अपिलार्थीने व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद दिला. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २१-०३-२००६ रोजी ११-३० वाजता संबंधीत नस्तीची पाहणी करण्याकरिता बोलाविले होते तथापि त्या दिवशी स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणूक असल्यामुळे महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये बाहेरुन कोणासही प्रवेश दिला गेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात ही नस्ती पाहण्यासाठी उपस्थित राहता आले नाही. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविलेले दिनांक १८-०३-२००६ चे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी ही कागदपत्रे नंतर तयार केली असून ही कागदपत्रे बनावट असल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली नस्ती पाहण्याची मूळ मागणी कायम ठेवलेली आहे.

या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००६ रोजी घेऊन दिनांक २६-०५-२००६ रोजी या सुनावणी संदर्भातील आपले आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत संबंधीत नस्ती दाखविण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील आदेशास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १६-०६-२००६ च्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून संबंधीत नस्तीची पाहणी करण्याकरिता अपिलार्थीस ती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक २२-०६-२००६ रोजी प्राप्त झाले.

तथापि तत्पुर्वीच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले होते. सदर अपील आयोगास प्रत्यक्षात दिनांक २१-०६-२००६ रोजी प्राप्त झाले. या अपिलामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) अन्वये प्रतिदिनी रुपये २५० इतकी शास्ती लावण्याची विनंती केली आहे व त्याच बरोबर प्रथम अपील अधिका-यास दंड करण्याचा अधिकार आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी डॉक्टर डी. बी. पाटील वैद्यकीय अधिकारी महानगरपालिका यांची सेवानिश्चिती संदर्भातील नस्ती पाहण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००६ रोजी अर्ज केला होता व त्यावरील उत्तर त्यांना उशिरात उशीरा दिनांक २०-०३-२००६ रोजी मिळणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपेक्षित होते. तथापि सदर नस्ती उपलब्ध करुन देण्याची प्रथम तयारी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये दर्शविली. या प्रकरणी त्यांनी विहित मुदतीपेक्षा अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यापोटी एकूण ८५ दिवसाचा विलंब लावला असल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी २५० रुपये याप्रमाणे शास्ती लावावी. जेणेकरुन नाशिक महानगरपालिकेत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेले दिनांक १८-०३-२००६ चे पत्र ज्यामध्ये महानगर पालिकेची संबंधीत नस्ती पाहण्यासाठी जन माहिती अधिका-याने तयारी दर्शविली आहे -- हे पूर्णपणे बनावट आहे. त्यांना हे पत्र जन माहिती अधिका-याकडून आजतागायत प्राप्त झाले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत नस्ती पाहण्याची तयारी

दर्शविली आहे. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २१-०३-२००६ रोजी सदर नस्तीची पाहणी करण्याकरिता बोलाविले होते तथापि त्या दिवशी स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणूक असल्याने इतर विभागातील अधिकारी / कर्मचा-यांना मनपा इमारतीमध्ये प्रवेश बंद करण्यात आला होता. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०५-२००६ रोजी निर्णय दिल्यानंतर देखील त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर नस्ती पाहण्याकरिता उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले असल्यामुळे त्यांनी ही नस्ती पाहण्यासाठी नकार दिला.

वरील घटनाक्रम पाहिला असता यामध्ये जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस संबंधीत नस्ती उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील भूमिका थोडीशी आक्षेपार्ह आहे असे आयोगाचे मत आहे कारण जर दिनांक २१-०३-२००६ रोजी अपिलार्थीस नस्ती पाहण्याकरिता बोलाविले आणि त्या दिवशी स्थायी समितीच्या सभापती पदाच्या निवडणुकीने शक्य झाले नाही तरीही जन माहिती अधिकारी यांना उर्वरीत दिवशी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याविषयी कोणत्याही प्रकारे विनंती करता आली असती. सदर विनंती दूरध्वनी व लेखी पत्राव्दारे त्यांना करता आली असती. तथापि अशा प्रकारची कोणतीही सकारात्मक कृती जन माहिती अधिकारी यांच्याकडून केली गेली नसल्याचे आज सुनावणीमध्ये निदर्शनास आले आहे. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००६ रोजी खरोखरच पत्र पाठविले आहे किंवा कसे याचा संभ्रम निर्माण होतो कारण जन माहिती अधिकारी यांना आयोगाकडे आपले म्हणणे स्पष्ट करण्याप्रित्यर्थ आयोगाने सूचना देऊनही त्यांनी त्यांच्याकडील आवक जावक रजिस्टर सुनावणीच्या वेळी आणले नव्हते यास्तव जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेल्या अशा प्रकारच्या भुमिकेमध्ये संशय घेण्यासाठी भरपूर वाव आहे. त्याच बरोबर त्यांनी जर अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००६

रोजी माहिती अर्जासंदर्भात पत्र पाठविले होते तर त्याचा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणी आदेशामध्ये कोठेही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे आढळत नाही.

वरील दोन्ही बाबी पाहता जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणातील वर्तनावर शंका घेण्यासाठी वाव आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, ते व डॉक्टर डी. बी. पाटील हे दोघेही एकाच वेळी महानगरपालिकेच्या सेवेमध्ये रुजू झाले. तथापि डॉक्टर डी. बी. पाटील यांनाच फक्त पुर्वीची शासकीय सेवा सलग धरुन तदअनुषंगीक सेवेतील सर्व फायदे देण्यात आले व हेच फायदे अपिलार्थी यांना नाकारण्यात आले असल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला आहे अशी त्यांची भावना आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असे आदेशीत करण्यात येते की :

आयुक्त महानगरपालिका नाशिक यांनी अपिलार्थी यांच्या प्रकरणात वैयक्तीक लक्ष घालून आपला अंतिम निर्णय त्वरित पारित करावा व या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी पार पाडलेल्या त्यांच्या भूमिकेच्या संदर्भात स्वतः चौकशी करुन आवश्यक वाटल्यास त्यांचेवर प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल दोन महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले हे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयुक्त महानगरपालिका नाशिक यांनी या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचेवर, आवश्यक असल्यास, प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल दोन महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण सदाशिव बागडे, बिटको हॉस्पिटल, नाशिक रोड, नाशिक महानगरपालिका, नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा आस्थापना प्रमुख, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५९०

दिनांक २९-०९-२००७

श्री. एकबाल अहमद मोहंमद नजीर, : अपिलार्थी

रा. घर नं. ८००/५०, किल्ला, रविवार वॉर्ड,

मालेगाव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्य अभियंता यांचे कार्यालय, महाराष्ट्र
राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, तळ
मजला, विद्युत भवन, नाशिक रोड,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य अभियंता यांचे कार्यालय, महाराष्ट्र
राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, तळ
मजला, विद्युत भवन, नाशिक रोड,
नाशिक

सध्या : जन माहिती अधिकारी : सहाय्यक अभियंता, मालेगाव शहर तथा ग्रामीण विभाग, मालेगाव
जन अपिलीय अधिकारी कार्यकारी अभियंता, मालेगाव शहर तथा ग्रामीण विभाग, मालेगाव

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०९-२००७ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. एकबाल अहमद मोहंमद नजीर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, मालेगाव

शहर तथा ग्रामीण विभाग श्री. दिलीप रामदास पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) कार्यकारी अभियंता, नाशिक परिमंडळ, म.रा.वि.वि.कं.म. नाशिक श्री. ललीत ठाकूर व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मालेगाव शहर तथा ग्रामीण विभाग श्री. अंबादास साकोजी तायडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सिटी सर्व्हे नंबर ९३७/२६० गुरुवार वॉर्ड, सैय्यद मखदुम आशरफ चौक मालेगाव येथील डी. पी. क्रमांक ५ हलविण्यासंबंधात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने माहितीशी संबंधीत कालावधी ०१-०१-१९९० ते २१-०८-२००६ असा दर्शविला आहे.

अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीमध्ये – डी. पी. हलविण्यासाठी कोठे अर्ज करावा त्या अधिका-याचा हुद्दा व कार्यालयाचा पूर्ण पत्ता, डी. पी. कोणत्या कायद्याने व कोणत्या नियमाने इतरत्र हलविता येते याचा लेखी खुलासा कलम नंबरासह, डी. पी. हलविण्याकरिता लागणारी आवश्यक फी किती व ती कोठे भरावी, अर्ज केल्यानंतर नियमाने किती दिवसांनी डी. पी. इतरत्र हलविता येईल, अर्ज केल्यानंतर या प्रकरणी तपास करण्यास जबाबदार असलेल्या अधिका-याचा हुद्दा व त्यांच्या कार्यालयाचा पत्ता, मूळ मंजूरी ज्या अधिका-याकडून देण्यात येते त्या अधिका-याचा हुद्दा व कार्यालयीन पत्ता, डी. पी. मुळे अपघात झाल्यास नुकसानभरपाई करिता कोणाकडे अर्ज करावा त्या अधिका-याचा हुद्दा व कार्यालयीन पत्ता आणि एकूण किती रक्कम अनुज्ञेय होईल, अशी रक्कम व या प्रकरणी सदर परिसरातील लोकांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत

वितरण कंपनी शहर विभाग, मोती भवन यांच्याकडे अर्ज केला तो बरोबर आहे किंवा कसे – या माहितीचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहिती-तील सर्व मुद्दयावर माहिती दिल्याचे दिसून येते. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविले. त्यांनी अपिलार्थीस पत्र पाठविल्याप्रित्यर्थ त्यांच्या कडील जावक पत्राचे रजिस्टर आयोगास दाखविले तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली असता त्यांना साध्या पोस्टाने ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी पाठविण्याचे काही प्रयोजन नव्हते. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळाच्या कार्यालयामार्फत नेहमी अशा प्रकारे पत्रव्यवहार करण्यात येऊन जनतेस खरी माहिती मिळण्यापासून वंचित ठेवले जाते. हे सर्व करण्यामागे जन माहिती अधिकारी किंवा वीज मंडळाचे कर्मचारी / अधिकारी यांचा उद्देश काय असे विचारले असता त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कर्मचारी खाजगीरित्या नागरिकांकडून पैसे घेवून डी. पी. हलविण्याची कामे करतात व सदर रक्कम शासनाच्या तिजोरीत जात नाही व त्यामुळे भ्रष्टाचारास वाव मिळतो असे म्हणणे अपिलार्थीने आज आयोगापुढे मांडले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये दिनांक १३-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपील अर्जात देखील अपिलार्थीने या अपील प्रकरणी त्यांच्याकडून अपिलार्थीस होणारा सर्व संभाव्य पत्रव्यवहार नोंदणीकृत टपालाने करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. त्याबरोबर ही माहिती रजिस्टर टपालाने पाठविण्यात येण्यासाठी लागणारे शुल्क भरण्याची तयारी देखील

आपल्या अर्जामध्ये दर्शविली आहे.  तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.  तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०१-१२-२००६ च्या पत्रान्वये अपिलार्थीचे अपील, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर असल्याने, निकाली काढल्याचे कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही कृती बरोबर नसून त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात एकत्र बोलावून घेऊन दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेऊन आपला अंतीम निर्णय त्वरीत जारी करणे अपेक्षित होते.  तथापि त्यांनी या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही कृती केलेली आयोगास दिसून आली नाही.  त्यांच्या या बेजबाबदार वर्तनाची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळ, मुंबई यांनी यथायोग्य नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व त्यांनी यापुढे अशा प्रकारच्या अनियमितता टाळाव्यात असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार दिनांक ०६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले.  या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केला असल्यामुळे कलम २० (१) अन्वये शिस्तभंगाची कारवाई करावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य मिळावी व जन माहिती

अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ चा भंग केल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मालेगाव महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेवर बरीचशी अतिक्रमणे झाली असून काही ठिकाणी महानगरपालिकेने बांधलेल्या गटारावर देखील लोकांनी बांधकामे केली आहेत. वीज वितरण कंपनीची डी. पी. विद्युत लाईन महानगरपालिकेच्या रस्त्याच्या कडे कडेने केली असून अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये उल्लेखलेल्या डी. पी. पासून आसपासच्या रहिवाशांच्या जिवितास व मालमत्तेस कोणताही धोका नाही. तसेच त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की, अपिलार्थीने केलेल्या दिनांक २१-०८-२००६ च्या अर्जास उद्देशून दिनांक २८-०९-२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांच्या कार्यालयातील जावक रजिस्टर स्टॅम्प रजिस्टरची प्रत दाखविली. त्याच्यामध्ये अपिलार्थीस वीज कंपनीने एक स्टॅम्प लावलेले पाकीट पाठविल्याचे दिसून येते. सदर पत्र अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींग व्दारे त्यांच्या कार्यालयातील पत्र जावक रजिस्टरमधील ८०९१ या क्रमांकाने व दिनांक २९-०९-२००६ रोजी पाठविल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम व पत्रव्यवहार पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली होती परंतु अपिलार्थीस ती अद्यापपर्यत पोहोचली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे त्यामध्ये वीज कर्मचा--यांचा अथवा कोणा अधिका-याचा ती न देण्यात वैयक्तीक लाभ असण्याची कोणतीही शक्यता दिसून येत नाही.

तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमीत

झाल्यापासून ३ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरवावी. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये हेतूपुरस्सर टाळाटाळ जरी केल्याचे आढळून आले नसले तरी अपिलार्थीस त्यांनी दिलेले दिनांक २८-०९-२००६ चे पत्र त्याच दिवशी अपिलार्थीस रजिस्टर्ड टपालाव्दारे पाठविले जाईल अशी खात्री करणे जरुरीचे होते. तथापि हे पत्र नेहमीच्या पत्रव्यवहाराप्रमाणे पत्रव्यवहार शाखेत ६ दिवस पडून राहिले व अंतीमतः दिनांक ०४-१०-२००६ रोजी अपिलार्थीकडे रवाना झाले. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील पत्रव्यवहाराची सदर पध्दत पाहता ही पध्दत माहिती अधिकार अधिनियमास सकारात्मक प्रतिसाद देणारी आहे असे निश्चितपणे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल. तेव्हा त्यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम संदर्भातील त्यांच्या कार्यालयातील होणा-या पत्रव्यवहाराबाबत त्यांनी यापुढे सतर्क राहून अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी केली आहे ती माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर ३ दिवसाच्या आत विनामूल्य प्राप्त होईल अशा पध्दतीने त्यांच्या कार्यालयाने पाठवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य आर. पी. ए. डी. ने पाठवावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. एकबाल अहमद मोहंमद नजीर, रा. घर नं. ८००/५०, किल्ला, रविवार वॉर्ड, मालेगाव, जिल्हा नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, मालेगाव शहर तथा ग्रामीण विभाग, मालेगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मालेगाव शहर तथा ग्रामीण विभाग, मालेगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पुर्व), मुंबई – ४०० ०५१

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५९२

दिनांक २९-०९-२००७

श्री. माधवसिंह नारायणसिंह पचलोरे (परदेशी) : अपिलार्थी
मु. पो. लोहोणेर, तालुका देवळा,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र
पडताळणी समिती नाशिक विभाग, नाशिक,
मध्यवर्ती प्रशासकीय महसूल आयुक्तालय,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अध्यक्ष तथा अपर महसूल आयुक्त,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
नाशिक विभाग, नाशिक, मध्यवर्ती प्रशासकीय
महसूल आयुक्तालय, नाशिक

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०९-२००७ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. माधवसिंह नारायणसिंह पचलोरे (परदेशी) (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती श्री. मधुकर नामदेव पाटोळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष तथा अपर महसूल आयुक्त, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती हे गैरहजर आहेत.

आजच्या सुनावणीस जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त नाशिक महसूल विभाग हे गैरहजर आहेत त्यांचे गैरहजेरीचे कारण विचारले असता ते आयुक्तांबरोबर दौ-या-वर गेल्याचे त्यांच्या प्रतिनिधीने सांगितले. राज्य माहिती आयोगाकडे साक्षीसाठी उपस्थित राहणे हे न्यायालयाच्या साक्षीइतकेच महत्वाचे असून या प्रकरणी अपर विभागीय आयुक्त यांनी दाखविलेल्या अनुपस्थित राहण्याच्या त्यांच्या वर्तनाची सखेद नोंद घेण्यात येत असून त्यांच्या या वर्तनाची यथायोग्य दखल मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांनी घ्यावी आणि आपला अहवाल दोन महिन्याच्या आत आयोगास पाठवावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " मी स्वतः, माझी मुलगी (१) कुमारी मंजुषा (२) कुमारी वर्षा, मुलगा कुमार प्रमोदकुमार, कुमार विनोदकुमार यांच्या जातीच्या दाखल्यासाठी मा. उपविभागीय अधिकारी कळवण तालुका कळवण जिल्हा नाशिक यांच्या निर्णयाविरुध्दचे माझे तारीख २३-०३-२००४ च्या अपिलाबाबत. "

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १६-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाच्या अपील करण्याच्या दिनांकापर्यत जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतली नसल्याचे नमूद केले आहे. या प्रथम अपिलाची सुनावणी जन अपिलीय

अधिकारी यांनी दिनांक १२-०९-२००७ रोजी घेऊन त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली अपिलार्थीच्या अर्जासंदर्भातील सद्यस्थिती तोंडी विदित केली. त्यामध्ये अपिलार्थीचे प्रकरण सखोल स्थानिक गृह चौकशीसाठी दक्षता पथक यांच्याकडे पाठविण्यात आले असून दक्षता पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या जात प्रमाणपत्राबाबत समिती १५ दिवसाच्या आत निर्णय घेईल असा निर्णय घेण्यात आला असल्याचे अपिलार्थीस ज्ञात करुन देण्यात आले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार करण्यात आलेले अपील जास्तीत जास्त ३० ते ४५ दिवसात ठरविणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे तथापि त्यांनी या प्रकरणी अंदाजे विहित मुदतीपेक्षा अंदाजे ९ महिने इतका जास्त विलंब लावल्याचे दिसून येते. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींच्या अंमलबजावणी संदर्भात किमान आवश्यक ज्ञान प्राप्त आहे किंवा कसे याबाबत संभ्रम निर्माण होतो.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना त्वरीत मिळावी, त्यांच्या जात पडताळणी प्रकरणाची त्वरेने चौकशी होऊन त्यासंबंधी निकाल मिळावा अथवा त्यांच्या जात पडताळणी प्रकरणी निर्णय घेण्यास काही अडचणी येत असल्यास त्या अडचणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळवाव्या जेणेकरुन त्या अडचणीचे अनुपालन अपिलार्थीस विहित मुदतीत करता येईल. अपिलार्थीस सदर जात प्रमाणपत्र विहित मुदतीत मिळणे अत्यंत

आवश्यक असून त्यांना त्यांच्या मुलांचे शैक्षणिक भवितव्य घडविण्याच्या दृष्टीने ही माहिती त्यांना लवकरात लवकर हवी आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीत माहिती देण्यासाठीचा कोणताही पत्रव्यवहार त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थीचे जात पडताळणी प्रकरण गृह चौकशीसाठी आता दक्षता पथकाकडे पाठविले असून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात येईल. सदर पथकाचा अहवाल प्राप्त आहे किंवा कसे असे विचारले असता सदर अहवाल त्यांना १८-०९-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांना आता अपिलार्थीस दिनांक ०४-१०-२००७ रोजी अगर त्यापुर्वी या प्रकरणातील निर्णय देणे शक्य होईल.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेला पत्रव्यवहार पाहता अपिलार्थीस दिनांक ०४-१०-२००७ रोजी पर्यत त्यांनी मूळ माहितीसाठी केलेल्या अर्जा-संदर्भात निर्णय प्राप्त होईल असे अनुमान काढण्यात येत आहे. त्याप्रमाणे संबंधीत जात पडताळणी समितीने तात्काळ बैठक आयोजित करुन अपिलार्थीस कोणत्याही परिस्थितीत दिनांक ०४-१०-२००७ रोजी अगर त्यापुर्वी आपला निर्णय कळविणे भाग आहे असे आदेशित करण्यात येत आहे.

प्रसंगवशात या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अर्ज केला असतांना देखील त्याची कोणत्याही प्रकारची दखल जन माहिती अधिकारी यांनी घेतली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने दिनांक १६-११-२००६ रोजी प्रथम अपील अर्ज करुनही त्याची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी न घेणे हे त्यांच्या

मनामध्ये माहिती अधिकार अधिनियमाप्रती असलेला अनादर स्पष्ट करते. अपिलार्थीच्या मूळ अर्जास व अपील अर्जास ज्या पध्दतीने संबंधीत अधिका-यांनी प्रतिसाद दिला आहे त्यावरुन त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाईचे वर्तन स्पष्ट होते.

सबब असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सचिव (सामाजिक न्याय) यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे त्यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-१०-२००७ रोजी अगर त्यापुर्वी अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी व तदनंतर ७ दिवसाच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल सचिव (सामाजिक न्याय) यांनी त्यांच्यावर यथायोग्य कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास ३ महिन्याच्या आत सादर करावा.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. माधवसिंह नारायणसिंह पचलोरे (परदेशी) मु. पो. लोहोणेर, तालुका देवळा, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती नाशिक विभाग, नाशिक, मध्यवर्ती प्रशासकीय महसूल आयुक्तालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष तथा अपर महसूल आयुक्त, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती नाशिक विभाग, नाशिक, मध्यवर्ती प्रशासकीय महसूल आयुक्तालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५९४

दिनांक २९-०९-२००७

श्री. शमसोद्दीन सांडुभाई अत्तार, : अपिलार्थी

ऊंबरखेड रोड, यशवंतनगर,

मु. पो. पिंपळगाव बसवंत, तालुका निफाड,

जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, नाशिक

सध्याचे : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक

जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०९-२००७ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शमसोद्दीन सांडुभाई अत्तार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक श्री. रविंद्र शिवनाथ आंधळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद श्री. जगन्नाथ सदाशिव भोर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे “ माजी आमदार निफाड श्रीमती मं. रा. कदम यांनी दिनांक १७-०४-२००० रोजी जिल्हा परिषदेस पत्र देवून पिंपळगाव बसवंत ग्राम-पंचायतीच्या गैरकायदा जागा भाडे वसुलीसंदर्भात दिलेल्या अर्जातील कारवाईबाबत ” माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती मध्ये एकूण ११ मुद्दयांचा समावेश आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या या माहितीमध्ये -- उपरोक्त विषयासंदर्भात केलेल्या तक्रारीच्या चौकशीचे काम पूर्ण झाले आहे काय, चौकशीचे काम पूर्ण झाले नसल्याचा त्याची कारणे, संबंधीत अधिका-याच्या विरुध्द पोलिसात गुन्हे दाखल झाले नसल्यास त्याची कारणे, महाराष्ट्र शासनाचे ग्रामीण विकास विभागाचे उपसचिव यांनी जुलै १९७५ च्या पत्राच्यामध्ये सूचित केलेल्या धोरणात आता बदल झाला आहे काय, असल्यास त्याची प्रत, अपहाराची रक्कम वसूली बरोबरच संबंधीतावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या शासनाच्या धोरणात हल्ली बदल झाला आहे काय याबाबत खुलासा व्हावा, यासंदर्भात संबंधीतांच्या विरुध्द पोलिसात गुन्हे दाखल करावे म्हणून त्यांनी केलेल्या विनंती अर्जावर झालेली कारवाई, अपिलार्थीने शासनाला पाठविलेल्या पत्राची प्रत अभिप्रायासाठी व अहवालासाठी जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाली आहे त्या शासन पत्राची प्रत, शासनास अहवाल सादर केला आहे काय, नाशिक जिल्हा परिषदेच्या माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती विनिता सिंघल व उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (ग्रामपंचायत) श्री. अंकुश चव्हाण यांचे हल्लीचे पत्ते, अपहार प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर दरमहा बैठका घेतल्या जातात हे खरे आहे काय, मार्च २००२ ते ऑक्टोंबर २००६ या दरम्यान किती आढावा बैठका झाल्या, या बैठकामध्ये निफाड तालुक्यातील अपहाराचा आढावा घेतला गेला आहे काय व सदर पंचायती मध्ये झालेल्या अपहारासंबंधी पोलिसात गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिनांक १६-०२-२००२ रोजी देऊनही अद्यापपर्यत पंचायत समिती स्तरावर त्यांची कारवाई झाली नाही, या दिरंगाईची कारणे, -- या मुद्यांचा समावेश होता.

वरील ११ मुद्दयांपैकी २ पूर्ण मुद्दे व १ मुद्दा अंशतः वगळता अपिलार्थीने जन माहिती अधिका-यास कारणे व खुलासा वजा माहिती विचारल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. तथापि हे पत्र अपिलार्थीस मिळाले नसल्याचे त्यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याप्रित्यर्थ त्यांच्याकडील जावक रजिस्टरची प्रत दाखविली असता त्यामध्ये अपिलार्थीस पत्र पाठविल्याचे दिसून येते. यावर अपिलार्थी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, त्यांनी या प्रकरणी प्रथम अर्जानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार दिनांक ०२-०१-२००७ रोजी अपील अर्ज केला होता तथापि या अपील अर्जावर जिल्हा परिषदेकडून कोणत्याही प्रकारचे प्रत्युत्तर त्यांना देण्यात आले नाही. त्याच बरोबर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक २२-०३-२००७ रोजी अपील अर्ज केला होता व त्याची प्रत त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिली होती त्यांनी दोन वेळा वेगवेगळ्या प्राधिकरणाकडे अपील अर्ज करुनही त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त झाली नाही अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने केलेल्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली गेली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी यावर असे उत्तर दिले की,

अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडील आवक रजिस्टरमध्ये नोंदविले गेले आहे तथापि तदनंतर अपिलार्थीचा अर्ज गहाळ झाल्याने त्यांना या अपिलाची सुनावणी घेता आली नाही.

अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी न झाल्याने व्यथित होवून अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगा कडे दिनांक २२-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) मधीलतरतुदी अन्वये कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांच्याकडील दिनांक ०४-१२-२००६ च्या पत्रान्वये पाठविली आहे व अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे केलेला अपील अर्ज जिल्हा परिषद कार्यालयाकडून गहाळ झाला असून या प्रकरणी सर्व जबाबदार कर्मचा-यावर कारवाई करण्याचे काम चालू आहे.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यास जन माहिती अधिकारी हे जाणुन-बुजून टाळाटाळ करीत आहेत. जर त्यांचा प्रथम अर्ज जिल्हा परिषदेच्या पत्रव्यवहारामध्ये गहाळ झाला होता तर त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलाची प्रत जिल्हा परिषदेला पाठविली असतांना त्यावेळी त्यांच्या मूळ अर्जाची व अपील अर्जाची जिल्हा परिषदेने दखल घेणे भाग होते तथापि त्यांनी तसे काहीही केलेले नाही यावरुन जिल्हा परिषद त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ करत आहेत.

वरील घटनाक्रम पाहिला असता एका बाजुला जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस माहिती दिल्याचे सांगतात व त्याप्रित्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयाचे जावक रजिस्टर आयोगास दाखविले तर दुस-या बाजुस अपिलार्थी हे त्यांना सदर पत्र मिळाले नसल्याचे सांगतात. त्याच

बरोबर अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जामध्ये माहिती व्यक्तिशः मागितली असतांना त्यांना जन माहिती अधिका-याकडून पोस्टाने माहिती पाठविण्याचे काही प्रयोजन नव्हते हाही मुद्दा अपिलार्थी आयोगासमोर मांडत आहेत. अपिलार्थी यांचे हे म्हणणे मान्य करता आणि एकूणच या प्रकरणातील क्लीष्टता पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे अनिवार्य आहे अशा निर्णयाप्रत आयोग आला आहे.

तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०२-०१-२००७ च्या प्रथम अपिल अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीकडून प्राप्त करुन घ्यावी व त्यावर, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपला निर्णय पारीत करावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावर जर अपिलार्थी यांचे समाधान झाले नाही तर ते राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०१-२००७ च्या अपील अर्जाची प्रत प्राप्त करुन घेऊन आपली सुनावणी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत घेऊन आपला निर्णय त्याच दिवशी पारीत करावा.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शमसोद्दीन सांडुभाई अत्तार, ऊंबरखेड रोड, यशवंतनगर, मु. पो. पिंपळगाव वसवंत, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती